# दुर्गकथा

निनाद बेडेकर

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय प्रवास
सं. क्र. ८८०२





REFBK-0027921
REFBK-0027921

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रवेश क्रमांक ७७९
दा. क्र. २७०२७
२८।३।९५
संदर्भ शाखा

भू. प्र.
७७९

संदर्भ
७७९

२७०२७
२८।३।९५

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे. तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल. ( किमान दंड १ रुपया घेतला जाईल. )

| | |
|---|---|
| 5 JUL 1995 | 24 APR 1996 |
| 2 AUG 1995 | 5 FEB 1997 |
| 9 AUG 1995 | १७।१०।९९ |
| 12 AUG 1995 | २०।१०।९९ |
| 19 AUG 1995 | |
| 30 SEP 1995 | |
| 18 OCT 1995 | |
| 28 OCT 1995 | |
| 2 DEC 1995 | |
| 10 FEB 1996 | |
| 9 MAR 1996 | |

( क्र. मा. पहा )
४००० -४-९५

# दुर्गकथा

निनाद बेडेकर

REFBK-0027921

पद्मगंधा
प्रकाशन

Durgakatha
By : Ninad Bedekar

# दुर्गकथा

निनाद बेडेकर

❖ **प्रकाशक**
अरुण जाखडे
पद्मगंधा प्रकाशन
३६/११ धन्वंतरी सह. गृह. संस्था,
पांडुरंग कॉलनी, एरंडवणा, पुणे - ३८

❖ **प्रकाशन पुष्प** : ३२

❖ © निनाद बेडेकर

❖ **प्रथमावृत्ती**
२७ फेब्रुवारी १९९५ (महाशिवरात्र)

❖ **मुखपृष्ट** :
रविमुकुल

❖ **मुद्रक**
जंगम कला मुद्रण
शनिवार पेठ, पुणे - ३०

❖ **अक्षर जुळणी**
श्री. संजय चव्हाण
कल्याणी ग्राफिक्स्
पुणे - ४११ ००२

**किंमत - ७०/- रुपये**

ISBN - 81 - 86177-32-32

गेली ४५ वर्षे माझ्यावर सतत मायेची
पाखर धरणारे आणि आयुष्यातील खडतर
प्रसंगात माझ्यामागे मदतीस सतत उभे राहणारे
माझे वडील

**श्री.गंगाधर चिंतामण बेडेकर**

आणि आई

**सौ.प्रमिला गंगाधर बेडेकर**

यांना सादर सप्रेम

- निनाद

'महाभारत' हा संस्कृत वाङ्मयातील एक प्रचंड ग्रंथ आहे. त्यांत तत्वज्ञान आहे. युद्धांची वर्णनें आहेत. गहन गूढ विषयांची विवेचनें आहेत. गुरूशिष्यांचे वादविवाद आणि संवाद आहेत. पण महाभारताचा सर्वांत जास्त भाग व्यापला आहे, कथांनी, जगातल्या सर्वच ललित वाङ्मयांत साम्राज्य आहे कथेचे. 'कथा' ही वाङ्मयातील आणि मानवी मनातील साम्राज्ञी आहे. महर्षि व्यास आणि वाल्मिकी हे तत्वज्ञानी महापंडित आहेत. पण त्याहूनहि उत्कट आणि उत्तुंग असे ते कथाकार आहेत. महाभारत आणि रामायण हे सत्य इतिहास आहेत की नाहीत, हा वादाचा विषय असेल. पण महाभारताने आणि रामायणाने साक्षात् इतिहास घडविले हे निर्विवाद सत्य आहे! आणि हेच, कथाकार व्यास वाल्मिकींचे प्रचंड यश आहे. ज्ञान, संस्कार, रंजन आणि मार्गदर्शन ह्या कथावाङ्मयातील अमृतधारा आहेत.

'इतिहास' हा विषयहि कथांनीच तुडुंब भरलेला आहे. इतिहासाला पाचवा वेद मानलेला आहे. या इतिहासातील कथांनीच किशोरांचं आणि युवकांचं जीवन शहाणं, समृद्ध, पराक्रमी आणि महत्त्वाकांक्षी होत असतं. इतिहास हे एक अतिशय मोलाचं धन आहे, याचा सुगावा आमच्या देशाला अजून लागलेला नाही. म्हणूनच आमचे गडकोट कोसळत आहेत, ऐतिहासिक कागदपत्रे पाणी तापविण्यासाठी चुलीत जळताहेत आणि सौंदर्यसंम्पन्न मौल्यवान् वस्तू परदेशांत पाठविल्या जात आहेत.

आणि म्हणूनच आमची मनें आणि मनगटें पिचून मोडताहेत आणि म्हणूनच आमचे सत्ताधीश आणि विचारवंत पंडित दचकत बिचकत जगताहेत! ही सुद्धा थक्क करणारी कथाच आहे.

पण आपल्या इतिहासातील हे कथावैभव नव्या उमलत्या पिढीपुढें मांडावं असा हौशी विचार आमच्या निनादराव बेडेकरांच्या मनांत खूप दिवसांपूर्वीपासून आला. तो त्यांनी फार वर्षांपूर्वीपासूनच कृतीत आणावयास प्रारंभहि केला. आजपर्यंत त्यांनी अगणित

युवकांना विविध गडकोटांवरून फिरवून आणलंय. इतिहासातील पुरूषार्थांची वादळं त्यांनी या मुलाबाळांच्या कानामनांत फुंकरली आहेत. नवा वन्ही ते चेतवीत आहेत. कागदपत्रांचा, ग्रंथांचा, स्थळांचा, वस्तूंचा आणि झाकोळलेल्या मनांचा अभ्यास ते अहोरात्र करीत आहेत. त्यांच्या भंवती तरूणांचा गराडा पडत आहे. नवे अंकुर त्यांतूनच हुंकार देत उठत आहेत. हे नवे क्षितीज तेजाळताना मी पाहतोय, अन् मला हे पाहून असं वाटतंय की, आपणहि पुन्हा सोळा वर्षांचं व्हावं! अन् एकशे सोळा वर्ष जगावं!

या कथासंग्रहातील सर्वच कथा छान आहेत. प्रेरक आहेत उद्‌बोधक आहेत. राजश्री निनादरावांची लेखणी सहज प्रवाही आहे पुस्तक भर्रकन वाचून संपतय! हेच श्री. निनादरावांचं यश आहे. जसं ते सहज बोलतात अन् ऐकणाराला गिरफ्तार करतात, तसंच ते लिहितातही हा प्रस्तुत कथासंच पाहिल्यावर असंच म्हणावसं वाटतय की, निनादराव, अजून खूपच खजिना शिल्लक आहे. तो बाहेर काढा आमच्या पुढं ओता! श्रीतुळजाभवानी आपल्या लेखणीला लाव्हा रसाचं तेज देईल, बळ देईल!

राजते लेखनावधि।।

बाबासाहेब पुरंदरे
पुरंदरे वाडा,
पुणे

# मनोगत

दै. सकाळचे प्रमुख संपादक, श्री. विजय कुवळेकर यांच्या प्रोत्साहनामुळे 'सकाळमध्येच' सुट्टीच्या पानावर 'गोष्टी किल्ल्यांच्या' या सदरात मी दुर्गांच्या कथा लिहिल्या, त्याचेच हे संकलन. हे सदर सुरू झाल्यावर अनेकांनी माझ्याकडे फोन करून आणि पत्रे पाठवून पसंती दर्शविली वाचकांच्या या प्रतिक्रियेमुळे मलाही हुरूप आला.

या दुर्ग कथात महाराष्ट्रातील दुर्ग प्रामुख्याने आले असले तरी, कर्नाटक, तमिळनाडू, मध्यप्रदेश वगैरे इतर प्रांतांतील दुर्गही आहेत. त्यात पाकिस्तानातील अटकेचा दुर्ग आहे. हे दुर्ग जरी इतर प्रांतांत असले तरी, मराठ्यांशी ह्या दुर्गांचा संबंध आलेला आहे. या गोष्टींतून मी जमेल तेवढी नवी माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

मी काही लेखक नाही. माझ्या या लिखाणाला अनेकांनी प्रोत्साहन दिले आहे. दै. सकाळचे श्री. विजय कुवळेकर आणि स्वाती महाळंक, माझे आई-वडील सौ. प्रमिला बेडेकर आणि श्री. गंगाधर चिंतामण बेडेकर, माझे मित्र प्रा. प्र. के घाणेकर, श्री. हेमंत गोखले, श्री. चंद्रशेखर नानिवडेकर, तसेच पद्मगंधाचे श्री. अरुण जाखडे, श्री. गजानन मेहेंदळे, श्री. एस. बी. कदम अशा अनेकांचा पाठिंबा आणि मदत मला मिळालेली आहे. या पुस्तकातील दुर्गांची बहुतांश छायाचित्रे माझे मित्र दुर्गप्रेमी श्री. सुधाकर भाऊराव कदम यांनी काढलेली आहेत. ती त्यांनी मोठ्या आनंदाने छापावयास दिली. याबद्दल त्यांचे आभार. श्री. कदम हिंदुस्थान अँन्टिबायोटिक्स लि. मध्ये गोडाऊन कीपर म्हणून काम करतात. सध्या ते ५५ वर्षांचे आहेत. त्यांचे सुमारे १५० दुर्ग पाहून झालेत. महाराष्ट्रातील सर्व दुर्गांची छायाचित्रे आपल्यापाशी असावीत अशी त्यांची मनिषा आहे. गुरुवर्य

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचेही मार्गदर्शन सतत मिळतच आहे.

दुर्गावर गेल्यावर त्या उद्‌ध्वस्त अवशेषातून हिंडत असताना शिक्षकांनी मुलांना या गोष्टी सांगाव्यात अशी माझी माफक अपेक्षा आहे.

निनाद बेडेकर, पुणे

प्रस्तुत पुस्तकात प्रत्येक लेखाच्या खाली दिलेले नकाशे लेखकाच्या रोजनिशीतील आहेत. सर्व नकाशे हे लेखकाच्या स्व-हस्ताक्षरातील व जसे आहेत तसेच, नोंदीसहित दिले आहेत.

दुर्गभ्रमण करताना व दुर्गांचा अभ्यास करताना यांचा उपयोग होईल.

— प्रकाशक

१

# मुरूडचा
# जंजिरा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

दुर्गाचा प्रकार :- जलदुर्ग
जिल्हा: - रायगड
राज्य : - महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : - मुरूड , अलिबाग

---



अलिबागनजीकच्या मुरूड या समुद्र किनाऱ्यालगतच्या गावाला मोठा सागरी इतिहास लाभला आहे.तेथून जवळच एका बेटावर सागरी लाटांचा

मारा खात जंजिऱ्याचा अति बळकट दुर्ग उभा आहे. वर्षानुवर्षांच्या सागर थैमानाशी झट्या घेत, शत्रूचे भयंकर हल्ले सोसणारा हा बळिवंत दुर्ग अखेरपर्यंत अजिंक्य राहिला.इथिओपियातून आलेल्या सिद्यांनी महाराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्यावर हा दुर्ग बांधून आपलं सागरी सामर्थ्य निर्माण केले. ते अभेद्य राहिलं !

पण सिद्दी येथे आलेच कसे, हा दुर्ग कसा निर्माण केला गेला, याची हकीगत मोठी मनोरंजक आहे.

१५व्या शतकाच्या अखेरीला या बेटावर रामा नावाच्या एका कोळ्याचा ताबा होता. लाकडी परकोट बांधून रामा कोळी मोठ्या मजेत राहात होता. तो अतिशय सावधानतेने वागत असे. ऐऱ्यागैऱ्या माणसाला तो या बेटावर येऊन देत नसे. रामा तलवारीचाही तालेवार होता. छोटी फौज बाळगून तो छोट्या राजासारखा राहात होता. सिद्यांना तो जवळही फिरकू देत नसे.

एकदा आपल्या हाताखालच्या, इतबारराव नावाच्या एका अनुयायावर बेट सोपवून रामा काही कामानिमित्त निघून गेला. पेरीमखान नावाच्या एका सिद्याला ही बातमी कळली. कोळ्याचं बेट ताब्यात घ्यावयाचा त्याने निश्चय केला.


दुसऱ्या दिवशी एक जहाज या बेटाजवळ येऊ लागले. इतबाररावास हे कळल्यावर छोट्या बोटीतून त्याने काही लढवय्ये कोळी त्या जहाजास मनाई करण्यास रवाना केले. पेरीमखान जहाजावरच होता. कोळ्यांचा सांडेल येताच त्याने सांगितले की, "जहाज उधानात सापडले होते. काही दुरुस्ती करणे आवश्यक आहे. एक दोन दिवस आसरा दिल्यास दुरुस्ती करून निघून जाऊ. इतर भेटींशिवाय जहाजावरचे उत्तम उंची मद्यही कोळ्यांना देऊ."

इतबाररावास हा निरोप कळताच, दारूच्या आशेने त्याने पेरीमखानास जहाज बेटाजवळ घेण्याची परवानगी दिली. जहाज आले. त्यातून उंची मद्याचे शे-सव्वाशे प्रचंड बुधले बेटावर उतरविण्यात आले. बुधल्या

पाठोपाठ उतरलेल्या कमनीय तरुणींनी रात्री बेटावरच्या कोळ्यांना सुरईतून मद्य पाजले. मद्याच्या नशेने कोळी धुंद झाले. इतबाररावासकट सगळेजण दारू पिऊन झिंगून पडले. कोणीतरी इशारा केला. इशाऱ्यासरशी दारूच्या काही बुधल्यातून काळे कुळकुळीत हबशी तेगा पाजळत बाहेर आले. धुंद होऊन लडबडलेल्या सर्व कोळ्यांची मुंडकी धडावेगळी करण्यात आली. रामा कोळ्याच्या बेटावर हबशांची विजयगर्जना घुमली,

"खस्सू ! खस्सू ! खस्सू ! खस्सू !!"

त्याच बेटावर पुढे जंजिऱ्याचा अभेद्य दुर्ग बांधण्यात आला. त्याला नाव दिले जंजिरे म्हिराब !




२

## तमिळनाडूतील
# जिंजी

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा: दक्षिण अर्काट
राज्य : तमिळनाडू
जवळचे ठिकाण : तिरुवन्नमलाई

---



मद्रासच्या दक्षिणेला सुमारे शे-सव्वाशे किलोमीटर्स अंतरावर जिंजीचा बलदंड दुर्ग उभा आहे. तीन टेकड्यांचा मिळून झालेला हा दुर्ग अति बेलाग

आहे. 'जिंजी म्हणजे तख्ताची जागा अशीच त्याची प्रसिद्धी आहे रायगडाइतकेच महत्त्व जिंजीस आहे. तमिळ लोक याला 'चेंजी' किंवा 'सेंजी' म्हणतात. चंद्रायण दुर्ग किंवा चंद्रगिरी, कृष्णगिरी आणि तो बलाढ्य राजगिरी या त्रिकुटाने जिंजीचा दुर्ग पूर्ण होतो. शिवाजीराजांनी याला नावे दिली 'शारंगगड', 'गर्वगड' आणि 'मदोन्मत्तगड'!

राजगिरीचा पहाड बुलंद आहे. एखाद्या अति बलाढ्य काळ्या हत्तीच्या गंडस्थळासारखा तो दिसतो. दक्षिणदिग्विजयाच्या मोहिमेच्या वेळेस शिवाजीराजांनी नासीर मुहम्मद या किल्लेदाराकडून हा दुर्ग जिंकून घेतला. पुढे येणाऱ्या आलमगिरी वादळाच्या वेळेस राजाराम महाराजांना आसरा देऊन या दुर्गाने मराठ्यांच्या इतिहासात मोलाची कामगिरी केली. एका कुलीन मराठी मुलीच्या धैर्याची हकीगत या दुर्गाने आपल्या उरीपोटी जपून ठेवली आहे.


आलमगीर औरंगजेबाच्या फौजेचा वेढा इ. स. १६८९ साली रायगडाला पडल्याने, छत्रपती राजाराम महाराज रायगड सोडून दक्षिणेकडे निघाले. त्यांचा पाठलाग करत मुघल फौज जिंजीपाशी येऊन थडकली. या मदोन्मत्तगडाने मराठ्यांच्या छत्रपतीला आणि त्याच्या कुटुंब-कबिल्याला मोठा आसरा दिला. पण झुल्फिकारखान नुस्रतजंग या मुघल सरदाराने जिंजीला वेढा घातला. धनाजी जाधव हा मराठा वीर बाहेरून हल्ले करत मुघल फौजेला सतत सतावत होता. वेढा ढिला पडत नव्हता. राजाराम महाराजांना जिंजी सोडून निघून जाण्याखेरीज गत्यंतर राहिले नव्हते. मोगल सैन्यात शिर्के, मोहिते वगैरे अनेक मराठी सरदार होते. त्यांच्याशी संधान बांधून, एक दिवस मेण्यात बसून राजाराम महाराज या मराठे सरदारांच्या 'आप्तांच्या बायका' म्हणून मोगलांच्या गोटात आले. या मंडळींनी अति सावधानतेने राजाराम महाराजांना सुखरूप धनाजी जाधवाकडे सोपवले. पंछी पिंजऱ्यातून उडून गेला!

चिडलेल्या मोगलांनी मदोन्मत्तगडावर हल्ला चढवला. शरणागतीशिवाय दुसरा उपाय मराठ्यांना राहिला नाही. ७ फेब्रुवारी १६९८ रोजी मुघली

फौजा गडात घुसल्या. मराठ्यांनी सपशेल शरणागती पत्करली. पण याही परिस्थितीत , मुघलांच्या हातात जिवंत सापडावयास नको म्हणून राजाराम महाराजांच्या एका राणीने किल्ल्यावरून उडी मारून आत्महत्त्या केली. अवघे मराठमंडळ हळहळले. हिच्या धैर्याच्या स्मृती जिंजीचा बेलाग दुर्ग उराशी जपून आहे.

## = जिंजी =

* मद्रास अर्काइव्हसमध्ये कागद ?
* तिरुवन्नमलाईला समोतीर पेरुमल किंवा 'समुद्र' पेरुमाळ शोधणे





* सारंगगड, गर्वगड, मदोन्मत्तगड कृष्णागिरी, राजागिरी, चंद्रागिरी हे काय ते बघणे
* पाण्याची टाकी.
* जिंजीवर वरती खंदक आणि त्यावर Draw Bridge आहे.
* राजवाडा . मोर्चे कोठे होते.
'तीरीख ए दिलकशा' मध्ये वर्णन आहे.

३

# पेडगावचा
# बहादूरगड

दुर्गाचा प्रकार : स्थलदुर्ग
जिल्हा : अहमदनगर
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : श्रीगोंदा / पेडगाव

---



दौंडच्या जवळ पांडे पेडगावचा स्थलदुर्ग अत्यंत पडीक अवस्थेत उभा आहे. भीमा नदीच्या काठावर हा दुर्ग औरंगजेबाचा दूधभाऊ मीर मलिक

हसन ऊर्फ बहादूरखान कोकलताश जफरजंग याने उभारला.

या दुर्गात यादवकालीन कलाकुसरीची तीन अप्रतिम मंदिरे आहेत

छत्रपती संभाजीराजांचे डोळे आलमगीराने याच परिसरात काढले. त्या वेळी संभाजीराजांची एक राणी, बहुधा दुर्गाबाई आणि एक बहीण याच दुर्गात कैदेत होत्या. या दुर्गाचे नाव बहादूरगड. सुरस आणि चमत्कारिक या सदरात मोडावी अशी एक घटना शिवकालात येथे घडली.

शिवराज्याभिषेक थोपवण्याचे काम औरंगजेबाने आपल्या लाडक्या दूधभावावर म्हणजे बहादूरखानावर सोपवले होते. त्याला ते जमले नाही! महाराजांचा रायगडावर राज्याभिषेक झाला. पण त्याला खर्चही खूप आला तो भरून काढावयास हवा ना!

शिवाजीराजांच्या हेरांनी त्यांना अचूक बातमी आणून दिली. बहादूरखानाने पेडगावात एक कोट रुपयांचा खजिना आणि उत्कृष्ट दोनशे अरबी घोडे औरंगजेबास पाठवण्यासाठी आणून ठेवले आहेत. बातमी ऐकताच शिवाजीराजांना अत्यानंद झाला. एवढा मोठा खजिना बहादूरखानाकडे आहे हे ऐकूनच त्यांना हर्ष झाला. शिवाजीराजे बहादूरखानास 'पेंडीचे गुरू' म्हणत असत. नाव जरी बहादूरखान असले तरी कोणतीही बहादुरी दाखवण्यास हा खान असमर्थ आहे हे महाराजांस माहीत होते.

नऊ हजार स्वारांची एक तुकडी महाराजांनी तात्काळ बहादूरगडाकडे रवाना केली. त्या तुकडीचा अधिपती कोण होता हे इतिहासाला नक्की माहीत नाही, परंतु बहुधा तो हंबीरराव मोहिते असावा.

हा सेनापती गनिमी काव्यात चांगलाच पारंगत होता. त्याने आपली सेना दोन तुकड्यात विभागली. दोन हजाराची एक तुकडी पश्चिमेकडून आरडाओरडा करत बहादूरगडावर चालून गेली. दुसरी मोठी तुकडी दक्षिणेकडे टेकड्यांत लपून बसली होती.


किल्ल्यावर मराठे चालून येत आहेत हे पाहिल्यावर बहादूरखानाने आपली सर्वच फौज या मराठ्यांवर सोडली. मुघलांचा हा पवित्रा पाहिल्यावर

मराठ्यांनी माघार घेतली. मोगलांनी त्याचा पाठलाग चालू केला.

मुघली फौज पाठलाग करत बरीच लांबवर गेल्यावर मराठ्यांच्या मोठ्या तुकडीने बहादूरगडावर हल्ला चढवला. किल्यातील प्रतिकार लुळा पडला. विजेच्या वेगाने आलेल्या मराठी फौजेने एक कोट रुपयांचा खजिना आणि दोनशे अरबी घोडे पळवून नेले. जाता जाता ते किल्ल्याला आग लावायलाही विसरले नाहीत.

आगीच्या प्रचंड ज्वालात बहादूरगड भस्मसात झाला. मराठ्यांना मोठी लूट मिळाली.

□□□



**४**

## वनदुर्ग
# वासोटा

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा : सातारा
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : तापोळे - महाबळेश्वर

---



कोयनेच्या अथांग जलाशयाच्या काठावर, एका डोंगर-ओळीत वासोट्याचा रौद्र दुर्ग उभा आहे. एका बाजूला रौद्रभीषण कडे आणि

दुसऱ्या बाजूला 'शिवसागर' जलाशय,यांच्या बेचक्यातून 'वासोटा' किंवा 'व्याघ्रगड' डोके वर काढतो. याच्या अवतीभवती पसरली आहे अति दाट वनराजी. दाट इतकी की सूर्यकिरणांनाही येथे मज्जाव आहे. जंगली जनावरांचा वावर येथे हमेशा असतो. वासोट्याची चढण दमछाक करणारी आहे. परंतु किल्ल्यावर गेल्यावर एक अवर्णनीय आनंद मिळतो.

शिवाजीराजांनी या दुर्गावर अनेकजणांना कैदी म्हणून ठेवले होते. त्यात इंग्रजांचाही समावेश होता. गडाभोवतालच्या रौद्रतेनेच कैदी गर्भगळीत होत असत. खरे पाहता हा वनदुर्गच आहे. दुर्ग लहान असला तरी दुर्गम आहे. बेलाग आहे. बळकट आहे.

दुर्गाच्या या बेलागपणामुळेच उत्तर पेशवाईत एका महिलेने पेशव्यांचा सरदार बापू गोखले याच्या सेनेशी अत्यंत प्रभावी झुंज देऊन हा किल्ला लढवला.

प्रतिनिधींच्या ताब्यात हा दुर्ग असताना त्यांचे पेशव्यांशी वैमनस्य झाले. प्रतिनिधींकडून त्यांची नाटकशाळा ताई तेलीण वासोट्यावर होती. डोळ्यात तेल घालून तिने कडक पहारा ठेवला होता. बापू गोखले हा कसलेला सेनापती होता. पण वासोट्याला वेढा घालून तो जिंकणे हे एक अवघडच काम होते. बापू गोखल्यानेच एका पत्रात लिहिले आहे, "डोंगर झाडी मनस्वी ! अडचण बहुत ! किल्ला बांका बहुत ! सात कोस ! अडीच मास झाडी तोडली तेव्हा मार्ग झाला."


ताई तेलीण दाद देईना. भोवतालचे रान बापूला सतावत होते. शेवटी या व्याघ्रगडानजीकच एक दुसरा डोंगर 'जुना वासोटा' म्हणून होता. बापू गोखल्याने आपले मोर्चे तेथवर नेले. अत्यंत परिश्रमपूर्वक एक तोफ त्या डोंगरावर चढवली आणि त्यातून मोठा मारा व्याघ्रगडावर चालू केला. ताई तेलिणीचा प्रतिकार पेशवाई फौजेपुढे लुळा पडला. बापू गोखल्याने हा दुर्ग अखेर काबीज केलाच. ताई तेलिणीला अटक करून तिची अतिशय मानाने पुण्याला रवानगी करण्यात आली.

पुढे इंग्रजांनाही पेशव्यांकडून हा दुर्ग जिंकताना अनेक अडचणी

आल्या. जनरल प्रिझलरच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश फौजा वासोटा घेण्यास आल्या. गडाच्या दुर्गमतेने प्रारंभी त्यांनाही दाद दिली नाही. अखेर ब्रिटिशांच्या ध्येयापोटी ह्याही दुर्गाचा घास त्यांनी घेतला. वासोटा ऊर्फ व्याघ्रगड हा आज उदास, भकास अवस्थेत उभा आहे. काळाच्या ओघात अनेक उन्मत्त सिंहासने मोडली गेली तेथे वासोटयाचा काय पाड ?

□□□

= वासोटा =



# ५

## पर्णालपर्वत

## पन्हाळगड

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा : कोल्हापूर
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : कोल्हापूर

---



महाराष्ट्र हा दुर्गांचाच देश आहे. रामचंद्रपंत अमात्यांनी आज्ञापत्रात म्हटले आहे : "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग"

शिवाजीराजांनी दुर्गांचे महत्त्व जाणले. त्यांनी जुने अनेक दुर्ग बळकट केले. काही नवे वसवले. एक अभिनव दुर्गशृंखला शिवाजीराजांनी निर्माण केली. या दुर्गांनीच पुढे आलमगीर औरंगजेबाच्या वादळाशी विजयी सामना केला.

पर्णालपर्वत म्हणजे पन्हाळा किंवा तीर्थराजपर्वत. शिलाहारांनी हा दुर्ग उभारला. दुर्ग बलाढ्य. टाकी, तळी, सरोवरे यांनी तो पुरेपूर भरलेला. धान्याच्या कोठ्या तर इतक्या मोठ्या की पाहातच बसावे! ही काय गंगाकोठी, ती यमुना कोठी! हजारो खंडी धान्य पोटात साठवून ठेवणारे हे अंबारखाने. तो सोमालयाचा प्रचंड तलाव. त्याच्या काठावरचे ते सोमेश्वराचे देवालय. तो तीन दरवाजा. तो चार दरवाजा. तो काय तो वाघ दरवाजा! ती राजदिंडी -- अशा नाना वाटा.

अफजलखानाला मारल्यावर ती बातमी पन्हाळ्यावर पोहोचावयाच्या आधीच शिवाजीराजे पन्हाळ्याखाली आले. दुर्ग त्यांच्या ताब्यात आला तेव्हा रात्र झाली होती. शिवाजीराजांना स्वस्थ बसवेना. बोलूनचालून तो 'गडपती' होता.


पालखीत बसून राजे रात्रीच गडावर आले. गड बघावयाची अनिवार इच्छा त्यांच्या मनात उत्पन्न झाली. महाराजांनी ती बोलून दाखवली. चंद्रज्योती, मेहताबा म्हणजे मशाली तयार झाल्या. राजा रात्रीच गड बघावयास निघाला. रात्रीचा दिवस झाला! राजा गड पाहात होता. तट, वाडे, विहिरी, तळी, सुंदर बागा, प्रवेशद्वारे, उद्याने, बुरुज असे सर्व तो वारंवार बघत राहिला.

दुर्गप्रेमी हा असा हवा! पन्हाळ्यावर शिवाजीराजांचे फार प्रेम. आदिलशाही सरहद्दीवरचा दुर्ग कबज्यात असणे आवश्यक असे. पुढेही हा दुर्ग जिंकून घेण्याचा प्रसंग आला तेव्हा शिवाजीराजांचे हजार लोक कापले गेले. स्वतः राजे त्या वेळी अधिपत्य करीत होते.

कोंडाजी फर्जंदाने अत्यंत आश्चर्यकारकरित्या हा दुर्ग जिंकून घेतला. केवळ साठ माणसांनिशी हा धाडसी जवान पन्हाळ्यावर गेला. शिंगे वाजवून

त्याने शत्रूस जागे केले आणि बाणांच्या सहाय्याने टिपले. शिवाजीराजे जेव्हा परत पन्हाळ्यावर गेले , तेव्हा दत्ताजीपंत वाकेनवीस यांनी राजांवर सुवर्णफुले उधळली. शिवाजीराजांनी त्या वेळी राजा भोज शिलाहाराने लावलेल्या चाफ्याच्या झाडावरील एक लक्ष फुलांचा अभिषेक सोमेश्वराला केला. असा तो राजा आणि असा हा गड !

□□□



# ६

## गरुडाचे घरटे

# तोरणा

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा : सातारा
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : वेल्हा

---



तोरणा हा कानदखोऱ्यातला एक बुलंद दुर्ग. अतिशय बाका. उंचीने गगनाला भिडणारा.पुणे जिल्ह्यातील सर्वात उंच किल्ला. उंची १४०४ मीटर्स

एका इंग्रजाने लिहून ठेवले आहे की , सिंहगड ही जर सिंहाची गुहा असेल , — तर तोरणा हे गरुडाचे घरटे आहे ! शिवाजीराजांनी या गडाचे नाव ठेवले 'प्रचंडगड.' या गडावर शिवाजीराजांना मोहरांचे हंडे सापडले म्हणे !

शत्रूला 'असह्य' होणाऱ्या या 'सह्य' पर्वताने मोगलांची दाणादाण उडवली होती.

इ. स. १६८९ - ९० च्या आसपास हा दुर्ग मोगलांच्या कबज्यात गेला. हातमखान याला 'किलेदारखान' असा किताब देऊन त्याची रवानगी तोरण्यावर किल्लेदार म्हणून करण्यात आली. ती त्याने अत्यंत नाखुशीने कबूल केली. त्याने आपला गुरू मियां अताउल्ला याला जे पत्र पाठवले आहे , त्यात तोरण्याची दुर्गमता दिसून येते. तो लिहितो :

"दैवाच्या विलक्षण तडाख्यामुळे मी तोरण्यात येऊन पडलो आहे. हे स्थळ तिटकारा करण्यासारखे आहे. भुतांचे आणि राक्षसांचे निवासस्थान आहे. मी अतिशय कष्टात आहे. माझ्याजवळ साधने नाहीत. मी किल्लेदार असलो तरी हा तोरणा माझ्यासाठी मूर्तिमंत कैदखानाच आहे. पायथ्यापासून टोकापर्यंत साखळीने मोजले तर याची उंची दोन कोस भरेल. यापैकी दीड कोस अंतर घोड्यावरून बसून , तर काही पायी चालून पार करता येते. यानंतर स्वारांसाठी अगर पायी चालण्यासारखी वाटच नाही. किल्ल्याच्या बाजूस दऱ्या आहेत. त्या 'असफलुस्साफलीन' म्हणजे सप्त पाताळातील नरकासारख्या दिसतात. पुढे वाट नाही. डोंगरात पायऱ्या खोदून काढल्या आहेत. पण त्याही अतिशय ओबडधोबड आहेत. धडधाकट , तरुण , मजबूत , चपळ माणसेही त्या पायऱ्या चढून जाईपर्यंत काकुळतीला येतात. मग माझ्यासारख्या दुबळ्या माणसाची काय कथा ? माणसे कष्ट करीत भलेबुरे बोलत कशीबशी किल्ल्यात पोहोचतात. या किल्ल्याची वाट अतिशय वेडीवाकडी आहे. हा दुर्ग आकाशाशी स्पर्धा करणारा आहे. या पृथ्वीवरील डोंगर या किल्ल्याच्या पासंगालाही पुरणार नाहीत. येथे राहातात भुते आणि सैतान ! भयंकर पावसात हा किल्ला प्रेषित नोहाच्या नौकेसारखा दिसून येतो. या किल्ल्याची परिस्थिती आणखी बिकट होते !"

**६**

## गरुडाचे घरटे

# तोरणा

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा : सातारा
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : वेल्हा



तोरणा हा कानदखोऱ्यातला एक बुलंद दुर्ग. अतिशय बाका. उंचीने गगनाला भिडणारा.पुणे जिल्ह्यातील सर्वात उंच किल्ला. उंची १४०४ मीटर्स

एका इंग्रजाने लिहून ठेवले आहे की , सिंहगड ही जर सिंहाची गुहा असेल , तर तोरणा हे गरुडाचे घरटे आहे ! शिवाजीराजांनी या गडाचे नाव ठेवले 'प्रचंडगड.' या गडावर शिवाजीराजांना मोहरांचे हंडे सापडले म्हणे !


शत्रूला 'असह्य' होणाऱ्या या 'सह्य' पर्वताने मोगलांची दाणादाण उडवली होती.

इ. स. १६८९ - ९० च्या आसपास हा दुर्ग मोगलांच्या कबज्यात गेला. हातमखान याला 'किलेदारखान' असा किताब देऊन त्याची रवानगी तोरण्यावर किल्लेदार म्हणून करण्यात आली. ती त्याने अत्यंत नाखुशीने कबूल केली. त्याने आपला गुरू मियां अताउल्ला याला जे पत्र पाठवले आहे , त्यात तोरण्याची दुर्गमता दिसून येते. तो लिहितो :

"दैवाच्या विलक्षण तडाख्यामुळे मी तोरण्यात येऊन पडलो आहे. हे स्थळ तिटकारा करण्यासारखे आहे. भुतांचे आणि राक्षसांचे निवासस्थान आहे. मी अतिशय कष्टात आहे. माझ्याजवळ साधने नाहीत. मी किल्लेदार असलो तरी हा तोरणा माझ्यासाठी मूर्तिमंत कैदखानाच आहे. पायथ्यापासून टोकापर्यंत साखळीने मोजले तर याची उंची दोन कोस भरेल. यापैकी दीड कोस अंतर घोड्यावरून बसून , तर काही पायी चालून पार करता येते. यानंतर स्वारांसाठी अगर पायी चालण्यासारखी वाटच नाही. किल्ल्याच्या बाजूस दऱ्या आहेत. त्या 'असफलुस्साफलीन' म्हणजे सप्त पाताळातील नरकासारख्या दिसतात. पुढे वाट नाही. डोंगरात पायऱ्या खोदून काढल्या आहेत. पण त्याही अतिशय ओबडधोबड आहेत. धडधाकट , तरुण , मजबूत , चपळ माणसेही त्या पायऱ्या चढून जाईपर्यंत काकुळतीला येतात. मग माझ्यासारख्या दुबळ्या माणसाची काय कथा ? माणसे कष्ट करीत भलेबुरे बोलत कशीबशी किल्लयात पोहोचतात. या किल्लयाची वाट अतिशय वेडीवाकडी आहे. हा दुर्ग आकाशाशी स्पर्धा करणारा आहे. या पृथ्वीवरील डोंगर या किल्ल्याच्या पासंगालाही पुरणार नाहीत. येथे राहातात भुते आणि सैतान ! भयंकर पावसात हा किल्ला प्रेषित नोहाच्या नौकेसारखा दिसून येतो. या किल्ल्याची परिस्थिती आणखी बिकट होते !"

एका मोगल माणसाने तीनशे वर्षांपूर्वीची परिस्थिती वर्णन केली आहे. आजही या परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. तोरण्यावर जाणाऱ्या प्रत्येक यात्रेकरूला आजही हाच अनुभव येतो. पण या दुर्गमतेतच दुर्गाचे बळ साठवलेले आहे. या दुर्गमतेच्या जोरावरच तर मराठ्यांनी औरंगजेबाला पंचवीस वर्षे कडवी झुंज दिली. आणि स्वराज्यरक्षण केले.

□□□



७

## पवनेकाठचा
# लोहगड

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा : पुणे
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : लोणावळा

---



लोणावळयाच्या अलीकडे मळवलीजवळ डाव्या हाताला लोहगड आणि विसापूर या दुर्गांची जोडगोळी एकमेकाला खेटून उभी आहे. विसापूर या

दुर्गांच्या पोटातच भाज्याची अप्रतिम लेणी खोदलेली आहेत. लोहगडावरही एक प्राचीन गुहा आहे. शे-दीडशे माणसं आरामात राहू शकतील एवढी मोठी गुहा आहे ही.

कल्याण लुटून आणलेला खजिना आणि सुरतेची लूट ही लोहगडावर आश्रयाला आणण्यात आली होती. लोहगडाची प्रवेशद्वारे बघण्यासारखी. दुर्गशिल्पांचा एक अप्रतिम नमुना म्हणूनच त्यांच्याकडे बघावे लागेल पवनमावळ आणि नाणेमावळ यांच्या बेचक्यात हे दोन दुर्ग पहाऱ्यासाठी वसवले गेले. कोकण आणि देश यांमधील घाटवाटांवर नजर ठेवण्यासाठी यांची निर्मिती झाली.

लोहगड आणि विसापूर या दुर्गांमध्ये एक खिंड आहे. दोन्ही दुर्गांची नाकाडे येथे जवळ आली आहेत. तसेच लोहगडाच्या ईशान्येच्या बाजूला डोंगरात एक मोठे छिद्र तयार झाले आहे. राजगडाच्या नेढ्यासारखे! यावरूनच एक आख्यायिका या राहाळात प्रचलित आहे.


हे दोन्ही गड मोगलांच्या ताब्यात असताना लोहगडावरील मुघली किल्लेदाराला एक वेगळीच शक्कल सुचली. महाराष्ट्राच्या खेडेगावातील लोक लवचिक आणि काटक असल्याने, कसरतीच्या कामात ते पारंगत असतात हे त्याला माहीत होते. एक दिवस विसापूर आणि लोहगड यामध्ये एक दोर बांधण्यात आला. जो कोणी विसापुराहून लोहगडावर या दोरावरून चालत येईल त्याला फार मोठे बक्षीस देण्याचे या मुघली किल्लेदाराने जाहीर केले. गावागावात दवंडी पिटली गेली. अनेक लोक जमले. पण बरेच जण हे आक्रित कोण करतो ते पाहावयास आलेले होते खिंडीमध्ये प्रचंड गर्दी झाली होती. एक तरणाबांड जवान शेवटी तयार झाला. ताडताड पावले टाकत तो विसापुरावर दाखल झाला. हातात एक काठी त्याने तोल सांभाळण्यासाठी घेतली होती. 'एकवीरा भवानी की जय' असे म्हणत त्याने दोरावर पाऊल टाकले. श्वास रोखून सर्वजण ते आश्चर्य बघत होते. तो जवान एक एक पाऊल टाकत पुढे येत होता. सर्वत्र शांतता पसरली होती. अर्धेअधिक अंतर काटून तो मुलगा लोहगडाकडे आला. पण

आता बक्षीस द्यावे लागणार म्हणून किल्लेदाराच्या आज्ञेने कोणीतरी दोरावर कुऱ्हाडीचा घाव घातला. दोराबरोबरच त्या धीट जवानाच्या आयुष्याची दोरीही तुटली. धाडकन तो खाली आदळून गतप्राण झाला आजही लोक त्याची पूजा करतात.

□□□

## = लोहगड =

* गुहा - लांबी रुंदी
* नाना फडणविसाचा शिलालेख
* दरवाजे - दुर्ग बांधणीचे फार मोठे वैशिष्ट्य
*




* विंचूकाटा - तोफा
* मिलखत आहे का नाही
* तोफ बुरुजावरची

# ८

## शिरवळचा
## सुभानमंगळ

दुर्गाचा प्रकार : स्थलदुर्ग
जिल्हा : सातारा
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : शिरवळ

---




शिरवळला नीरा नदीच्या काठावर आता किल्ले सुभानमंगळाचा एकमेव बुरुज उभा आहे. इथे पूर्वी एक किल्ला होता , असं सांगूनही खरं

वाटणार नाही अशी त्याची सध्याची स्थिती आहे. पण सुभानमंगळाला कशाला बोल लावायचा? महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्व दुर्गांची सद्यस्थिती हीच आहे. भुलेश्वर ऊर्फ दौलतमंगळ इथंही दुर्ग होता. इंदापूरलाही फतहमंगळ कोट होता! कित्येक अनाम वीरांनी हे दुर्ग जिंकण्यासाठी आपले प्राण पणाला लावले. रक्ताचे सडे शिंपडले. पण आज या युद्धभूमीवर दगडधोंडे आणि मातीढेकळांखेरीज काहीच दिसत नाही! शिरवळच्या या सुभानमंगळावर सदाजी जगताप नावाच्या एका मराठी वीराचा पराक्रम कोरला गेला आहे.

सुभानमंगळ हा काही फार लढाऊ कोट नव्हताच. काही बुरुज आणि थोडीशी पडलेली तटबंदी असेच त्याचे स्वरूप होते. शिवाजीराजांकडून आदिलशाहीच्या बाळाजी हैबतराव नावाच्या एका सरदाराने हा दुर्ग जिंकून घेतला. तेव्हा गोदाजी जगतापाला साथीला देऊन शिवाजीराजांनी कावजी मल्हारावर शिरवळचा सुभानमंगळ जिंकून घेण्याची कामगिरी सोपवली.

घोड्यावर बसून दौडत मराठे, 'हर हर महादेव' असे गर्जतच शिरवळावर चालून आले. दुर्गातून आदिलशाही सैन्य मराठी सैन्यावर चाके, नांगर, मुसळे, उखळे, गोटे, कोलिते, खैराच्या निखाऱ्याचे ढीग टाकत होते. पण त्याला दाद न देता फुटलेल्या तटाच्या ढिगावरून मराठी सैन्य आत घुसले. हातघाईची लढाई सुरू झाली. तलवारीचा खणखणाट झाला. धुळीचे ढग उसळले. तेवढ्यात सदाजी जगतापाची गाठ आदिलशाहीच्या अशरफशाहाशी पडली. अशरफाचे धनुष्य सदाजीने आपल्या खड्गाच्या घावाने तोडून टाकले. अशरफाने आपल्या हातात परिघ घेतला. पण सदाजीने तेही शस्त्र तोडून टाकले. शेवटी अशरफशाह पळून गेला. सदाजीने एक प्रचंड गर्जना केली. ती ऐकल्यावर शत्रूपैकी अनेकांचे पाय लटपटले. रक्ताने न्हालेला, तलवार घेऊन मुंडक्यांच्या ढिगावर नाचत असलेला सदाजी भैरवासारखा दिसत होता! त्याचे हे रूप बघून आदिलशाही सैनिक जागेवरच थिजले! मराठी सैन्याने कपाकापी सुरू केली. बाळाजी हैबतराव, मुसेखान ठार झाले. उरलेसुरले आदिलशाही सैन्य पळून गेले.

मराठ्यांची अस्मानी फत्ते झाली. शिरवळच्या सुभानमंगळाची भूमी आदिलशाही रक्ताने लालेलाल झाली. सुभानमंगळावरचा मराठी विजयघोष विजापूरला पोहोचला. आदिलशाहीला कानठळ्या बसल्या.



१

# खांदेरी

दुर्गाचा प्रकार : जलदुर्ग
जिल्हा : रायगड
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : अलिबाग, थळ



अष्टागरातील थळच्या समोर समुद्रात दोन बेटे आहेत. एकाचे नाव खांदेरी तर दुसऱ्याचे उंदेरी ! नावे जरा विचित्रच आहेत. मुंबईचे इंग्रज या

बेटांना ‘हेंन्द्री केंद्री’ असे म्हणत असत.

इंग्रजांना धडा शिकवण्याची एकही संधी शिवाजीराजे कधीही वाया दवडत नसत ! इ.स. १६७९मध्ये शिवाजीराजांनी अचानक काही माणसे मायनाक भंडारी ह्याच्या नेतृत्वाखाली खांदेरी बेटावर उतरवली आणि तेथे दुर्ग बांधणी चालू केली. मुंबईच्या इंग्रजांनी, हंटर आणि रिव्हेंज नावाची दोन मोठी जहाजे आणि काही गुराबा, गलबते किल्ल्याचे काम बंद करावयास पाठवली. मायनाक भंडाऱ्याने त्यांना दाद लागू दिली नाही

खांदेरी बेटाभोवती खूप खडक आहेत. ओहोटीच्या वेळेस पाणी ओसरल्यावर तर खडक उघडाच पडतो. थळ आणि खांदेरी यांच्यातील छोट्या पट्ट्यात आणि उथळ पाण्यात मोठ्या इंग्रजी जहाजांची पंचाईतच होऊ लागली. कॅप्टन विल्यम मिनचिनकडे थळहून बेटाकडे येणारी रसद थांबवण्याचे काम होते. पण रात्रीच्या अंधारात छोट्या बोटी वल्ही मारत खांदेरी बेटावर जाऊन रसद पुरवत असत. त्या बोटी कॅप्टन मिनचिनला सकाळीच दिसत असत. त्याने मुंबईला पाठवलेल्या एका पत्रात म्हटले आहे : “या छोट्या मराठी बोटी आम्हाला आश्चर्यकारकरित्या चकवतात. अशा बोटी इंग्रजी आरमारात हव्यात !”

एक दिवस इंग्रजांनी बेटावर केलेला हल्ला जागरूक मायनाकाने परतवला. त्यात काही इंग्रज मारले गेले आणि काही कैद झाले. तेवढ्यातच उंदेरी या बेटाचा ताबा जंजिरेकर सिद्याने घेतला. त्याने तेथे किल्लाच बांधावयास काढला.

एके दिवशी अचानक खांदेरी बेटावर पांढरी निशाणे दिसावयास लागली. सिद्दी आणि इंग्रजांना वाटले की मराठे शरणच आले. सिद्याचे काही लोक बोटीतून तत्परतेने खांदेरीकडे आले. त्यांना बेटावरील मराठ्यांनी शिव्या देऊन परतवून लावले ! मग इंग्रजही खांदेरीकडे आले. बोटीवरूनच त्यांनी ओरडून विचारले, की खांदेरीवर पांढरी निशाणे का लावली ?”

खांदेरी बेटावरील मराठ्यांनी सांगितले, “या निशाणाचा आणि तुमचा काही संबंध नाही. आम्ही शरणागती पत्करली नसून थळच्या

किनाऱ्यावरच्या आमच्या लोकांना काही संदेश पाठवण्यासाठी आम्ही हे पांढरी निशाणे लावली आहेत!"

इंग्रजांचा नाइलाज झाला. मुंबईकर इंग्रजांच्या नाकावर टिच्चून खांदेरीवर दुर्ग उभा राहिला. आज तो भग्नावस्थेत आहे!

□□□

## = खांदेरी = अलिबाग =




* नागावच्या खाडीचा आणि नदीचा शोध
* कान्होजी आंग्रे यांची समाधी
* बिवलकरांचा बंगला.
* खांदेरी आणि उंदेरी दुर्ग-बांधणीतील फरक
* थळ आणि खांदेरीमधील खडक (कोळ्यांना विचारणे)
* मुंबईहून खांदेरी दिसते का?
* थळहून वेळ

१०

# राजाचा
# राजगड

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा : पुणे
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : नसरापूर, वेल्हा



गुंजणमावळातला एक अत्यंत सुंदर आणि बलाढ्य किल्ला म्हणजे राजगड ! शिवाजीराजांची ही पहिली राजधानी. जवळ जवळ चोवीस वर्षे

शिवाजीराजांनी या गडावरच काढली. राजाराम महाराजांचा जन्म याच किल्ल्यावर झाला. शिवाजीराजांच्या थोरल्या राणीसाहेब सईबाई याच दुर्गावर मृत्यू पावल्या. राजगडाचे दर्शन केव्हाही सुरम्य असते. ती पद्मावती माची , ती सुवेळा आणि ती संजीवनी ! दगडी चिलखताने अभेद्य झालेल्या. त्यांच्या मध्यभागी उभा असलेला तो बालेकिल्ला. त्याची ती बिकट वाट ! त्यावरून दिसणारे आसमंत ! सारेच आगळे !

मुघल शाहनशाह औरंगजेब मराठ्यांचे एक एक किल्ले घेत चालला त्याला राजगडाचाही घास घ्यावासा वाटला. पण राजगडाची वाट सोपी नव्हती. डोंगरदऱ्या आणि घनदाट जंगलांनी ती बिकट बनली होती. झाडे तोडून वाट करणारे बेलदार पुढे पाठवण्यात आले. दोन महिने खपून त्यांनी जंगल तोडून वाट साफ केली. खासा औरंगजेब येणार ! म्हणजे त्याच्याबरोबर हत्ती , घोडे , उंट , लमाणांचे तांडे हे सर्वच येणार. सर्वजण जातील अशीच वाट हवी ना !

बादशाहा राजगडाकडे जाण्याच्या आधीच काही फौज राजगडाकडे निघाली. तरबियतखान , हमिदुद्दीनखान असे नामांकित उमराव त्या फौजेत होते. त्यांनी आधी जाऊन राजगड वेढला. त्यांना रुहुल्लाखान , मतलबखानही सामील होते. पण राजगड लढत होता. त्या वरील किल्लेदाराचे मत होते , "मोगल तो चार दिवसांचे सोबती !"


किल्लेदार गड लढवत होता. १० नोव्हेंबर १७०३ या दिवशी ओरंगजेब पुण्याहून राजगडाकडे निघाला. २७ नोव्हेंबर रोजी बादशाहाने रुस्तुमराव जाधव याचा मुलगा बहादूरजी याच्या मुलीचे शाहूशी लग्न लावायची आज्ञा केली.

बादशाहाने तडफेने काही धमधमे म्हणजे लाकडाचे उंचवटे उभे केले त्यावर मोठ्या तोफा नेण्यात आल्या. मुघल तोफा राजगडावर आग ओकू लागल्या. बादशाहाने वेढा आवळला. वेढा पाहण्यासाठी बादशाहा स्वतः निघाला. तो हिंडत असताना त्याच्या पालखीवर म्हणजे तख्ते खॉंवर किल्ल्यावरून मारा झाला. भोई पळाले. बादशाहा जमिनीवर पडला. मोठा

आरडाओरडा झाला. पण औरंगजेबाला फार लागले नव्हते. शिव्या देतच त्याने मुघली तोफखान्याला तोफा डागण्याची आज्ञा दिली. तोफांचा तिखट मारा राजगडावर चालू झाला. त्या माऱ्यात संताजी शिळीमकर मारला गेला ! १७ फेब्रुवारी १७०४ रोजी राजगडाने शरणागती पत्करली. मुघली नगारे, शहाजणे यांचा एकच दणदणाट झाला. नगारे वाजवणाऱ्यांनाच औरंगजेबाने आठ हजार दाम बक्षीस दिले.

□□□

= राजगड =



११

## दर्यादौलत
# सुवर्णदुर्ग

दुर्गाचा प्रकार : जलदुर्ग
जिल्हा : रायगड
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : दापोली

---



दापोलीच्या पुढे हर्णेनजीक ऐन समुद्रात सुवर्णदुर्ग आहे. त्याच्या रक्षणार्थ दर्यादौलत आहेच; पण हर्णेच्या किनाऱ्यावर तीन दुर्ग बांधून

सुवर्णदुर्ग शत्रूला हल्ल्यासाठी अवघडच करून ठेवला आहे. कनकदुर्ग, फत्तेगड आणि गोवा अशी त्या इतर तीन दुर्गांची नावे आहेत. छिन्नी लावून कातलेला खडक हे सुवर्णदुर्गाचे वैशिष्ट्य आहे. भोवताली दर्याचे खारे पाणी असताना या जलदुर्गामधील विहिरींना गोडे पाणी कसे काय मिळते हे अजबच आहे ! पण त्या गोड्या पाण्याच्या आधारावरच तर बेटावर दुर्ग बांधतात ना !

सुवर्णदुर्गाचा किल्लेदार होता अचलोजी मोहिते. त्याच्याच हाताखाली काम करीत होता कान्होजी आंग्रे ! अठरावीस वर्षांचा कान्होजी सागरी आणि जमिनीवरील बऱ्याच चकमकींचा अनुभव पाठीशी बांधून होता धाडसी, हिकमती, शूर आणि तरबेज म्हणून त्याची ख्याती होती. साहसी वृत्ती आणि सामर्थ्य त्याच्या रंध्रारंध्रांत मुरलेले होते.

या सुवर्णदुर्गावर अनेकजण टपलेले होते. मुंबईच्या इंग्रजांप्रमाणेच जंजिऱ्याच्या सिद्दयाचाही त्यावर डोळा होता. मोगलांच्यातर्फे लढणाऱ्या सिद्दयाने सुवर्णदुर्ग वेढला होता.


पाण्यात घिरट्या घालत होतं सिद्दयाचे आरमार. जमिनीवरचेही दुर्ग क्रौर्याने काबीज करून, काळे कुळकुळीत हबशी किनारपट्टी ताब्यात घेऊन बसले होते. सुवर्णदुर्गाच्या आश्रयाला कोणी येईल अशी आशा नव्हती. रसद नाही, दारूगोळा नाही, त्यामुळे किल्लेदार अचलोजी मोहित्याचा धीर खचत चालला होता. तसे सिद्दयाने फितूर केलेले लोकही त्याला किल्ला सिद्दयाच्या ताब्यात देण्यास सांगत होते.

बाळाजी विश्वनाथ हा एक साधा कारकून मात्र बाहेरच्या सिद्दयांच्या हालचालींची माहिती आत कान्होजी आंग्र्यास कळवीत होता. पाज गावचे काही कोळीही माहितीची देवाणघेवाण करीत होते. किल्ला कोणत्याही परिस्थितीत सिद्दयांच्या ताब्यात द्यावयाचा नाही हेच कान्होजीचे मत होते दिवसेंदिवस परिस्थिती गंभीर बनत होती.

किल्लेदार अचलोजी मोहिते पैसे घेऊन सुवर्णदुर्ग सिद्दयाच्या ताब्यात देणार अशी हमखास खबर बाळाजी विश्वनाथांना लागली. त्यांनी ती

कोळ्यांच्यामार्फत कान्होजींना कळवली. हा वीस वर्षांचा जवान खवळून उठला. त्याच रात्री कान्होजी आणि त्याच्या सहकाऱ्यांनी उठाव केला किल्लेदार अचलोजी मोहित्यासच कैद केले. इतर फितूरही वेचून मारले सुवर्णदुर्गावर भगवा झेंडा फडफडतच राहिला.

□□□



१२

कर्नाटकातील

# कोप्पळ

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा : रायचूर
राज्य : कर्नाटक
जवळचे ठिकाण : होस्पेट, गदग

---



कर्नाटकातील किल्ले आपल्या महाराष्ट्रातील किल्ल्यासारखे उंच नाहीत बुलंद, काळा फत्तर तेथे फारसा पाहावयास मिळत नाही. शिलाखंडांच्या

राशी दिसतात. त्यातूनच दुर्गांच्या तटबंद्या डोकावतात. पण तेथेही दुर्ग मोठ्या संख्येने आहेतच. मराठ्यांचाही ह्या दुर्गांशी संबंध आलेला आहे.


होस्पेट-गदग मधील कोप्पळचा दुर्ग हा असाच एक. हा काही नामांकित लढावू किल्ला नव्हे. छोटीशी तटबंदी, भरपूर पाण्याची तळी हेच त्याचे वैशिष्ट्य ! हा दुर्ग कृष्णा आणि तुंगभद्रा यांच्या दुआबात येतो. तुंगा आणि भद्रा या दोन नद्यांच्या संगमानंतर तुंगभद्रा नदी बनते ! कोप्पलळचा दुर्ग हा कर्नाटकाचा दरवाजाच होता.

शिवाजीराजे क़र्नाटकात दौऱ्यावर निघाले. या कोप्पळवर त्या वेळी अब्दुर्रहीमखान आणि हुसेनखान या मियाना बंधूंचा अम्मल होता. दोघेही यमदूतच होते. गाईगुरे, बायकामुले पळवणे हा त्यांचा आवडता छंद होता त्यांचा अम्मल अतिशय राक्षसी होता. प्रजा त्यांच्या अंमलाखाली होरपळून निघत होती. प्रजेला कोणी त्राता दिसत नव्हता. जुलमाच्या जात्याखाली भरडणे हेच त्यांच्या नशिबात लिहिले होते.

पण प्रकाशाचा एक किरण या कानडी प्रजेला दिसला. महाराष्ट्रात शिवाजी नावाचा एक पराक्रमी राजा राज्य करतो आहे, हे त्यांच्या कानावर गेले होते. राजा आचारशील, विचारशील आहे. दानशील, धर्मशील आणि सर्वज्ञपणे सुशील आहे हे त्यांना माहीत झाले होते. तो राजा येथूनच भागानगरला जाणार आहे हे कळताच, त्रस्त कानडी प्रजा कोप्पळच्या मियानांचे जुलमी गाऱ्हाणे घेऊन शिवाजीराजांकडे आली.

त्यांच्यावरील जुलमांची कथा ऐकून प्रेमळ शिवाजी राजाचे अंतःकरण द्रवले. हंबीरराव मोहिते या सेनापतीलाच शिवाजीराजांनी कोप्पळवर पाठवले. धुळीचे लोट उडवत मराठी सेना जुलमी पठाणांवर चालून गेली कोप्पळच्या किल्ल्यातून मियाना बंधू आपली सेना घेऊन चालून आले लिंगसुगूर जवळ या दोन फौजांची गाठ पडली. फार मोठे युद्ध झाले. हत्तीवर बसून मियाना बंधू येत होते. मराठी मावळातील एक गडी नागोजी जेधे हुसेनखानाच्या हत्तीवर चालून गेला. मराठ्यांच्या तिखट माऱ्यापुढे पठाणी फौजेची ससेहोलपट झाली. हुसेनखानाचा हत्ती लढाई सोडून पळून चालला

मराठ्यांनी हत्तीला गराडा घातला. मियाना जिवंत हाती लागला. खूप मोठी लूट मराठ्यांना मिळाली. पण मस्तकात बाण घुसून नागोजी जेधे ठार झाला कोप्पळच्या जुलमी पठाणी अंमल संपला.



# १३

बळकट
## वेलोर

दुर्गाचा प्रकार : स्थलदुर्ग
जिल्हा : उत्तर अर्काट
राज्य : तमिळनाडू
जवळचे ठिकाण : वेलोर



तमिळनाडूमध्येच जिंजीच्या अलीकडे वेलोरचा स्थलदुर्ग आहे. किल्ला अतिशय मातब्बर आहे. बळिवंत तट, बुरुज तर आहेतच; पण

त्यापलीकडे मोठा खंदक आहे. खंदकात सदैव पाणी असते. त्यात सुसरी सोडलेल्या असत. तटावरून मोठे गाडे जात असत इतका रुंद तट आहे.

इ.स. १६७७ च्या मे महिन्याच्या अखेरीस शिवाजीराजांनी या दुर्गाला वेढा घातला. अब्दुल्लाखान नावाचा एक हबशी या दुर्गाचा किल्लेदार होता त्याने किल्ला लढवावयाचे ठरवले. किल्ला सहजासहजी पडणारा नव्हताच. शिवाजीराजांनी जिंजीच्या नासिर मुहम्मदाकडून अब्दुल्लाखानाशी वेलोरचा किल्ला राजांच्या ताब्यात देण्याची गळ घातली; पण अब्दुल्लाखानाने साफ सांगितले :

"मी असले भ्याडपणाचे कृत्य करणार नाही. मी हा दुर्ग लढवीन!"

मराठ्यांचा वेढा बळकट होता. पण वेलोर नमत नव्हता. शिवाजीराजांना फार वेळ तेथे थांबणेही शक्य नव्हते. नरहरी रुद्र नावाच्या सरदाराकडे वेढ्याचा ताबा देऊन शिवाजीराजे पुढे निघाले. नरहरी रुद्रानेही खूप नेट लावला; पण वेलोर काही शरणागती पत्करेना. शेवटी मराठी सेनेने एक वेगळीच शक्कल काढली. वेलोरच्या नजीकच दोन उंच टेकड्या होत्या. मराठी सेनेने या दोन डोंगरावर दोन दुर्ग बांधले. एकास नाव दिले 'साजरा' तर दुसऱ्यास 'गोजरा.' या साजऱ्यागोजऱ्यावरून मराठी तोफखाना वेलोरवर आग पाखडू लागला. पण वेलोर नमत नव्हता. तुफान सरबत्ती होत असतानाही हबशी अब्दुल्लाखान वेलोरचा दुर्ग लढवत होता.

पण मराठ्यांच्या तिखट माऱ्यापुढे नाही तर महामारीच्या रोगापायी वेलोरचा दुर्ग पडला! चिवट सिद्दी निसर्गाच्या प्रकोपापुढे शरण गेला किल्ल्यात अचानक साथीचा रोग पसरला. विजापुरी लोक पटापट मरू लागले. औषधपाण्याचीही सोय राहिली नाही. विहिरीतील पाणी दूषित झाले रघुनाथपंत हणमंते आणि नरहरी रुद्र वगैरे याच संधीची वाट बघत होते

शेवटी हबशी अब्दुल्लाखान गलितगात्र झाला. जीवदान आणि थोडे पैसे घेऊन त्याने किल्ला मराठ्यांना देण्याचे ठरवले. पन्नास हजार होन घेऊन अब्दुल्लाखानाने २२ जुलै १६७८ रोजी वेलोरचा स्थलदुर्ग मराठ्यांना दिला वेलोरवर मराठी निशाण लागले.

१४

## यादवांचा
# देवगिरी

दुर्गाचा प्रकार : मिश्र दुर्ग
जिल्हा : औरंगाबाद
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : औरंगाबाद



खडकी किंवा औरंगाबाद या गावाजवळच देवगिरी किंवा दौलताबादचा अजोड स्थल-गिरिदुर्ग उभा आहे. एखाद्या काळ्याकभिन्न पहिलवानाने

मातीत अंग घुसळून , पवित्रा घेऊन कुस्तीला उभे राहावे तसा तो दिसतो राष्ट्रकूट दंतिदुर्गाने या दुर्गाच्या खोदाईचा प्रारंभ केला. वेरुळला जेव्हा कैलास हे कातळशिल्प कोरके कोरून काढत होते , तेव्हाच देवगिरीच्या या दुर्गावरही छिन्न्या पडत होत्या. तो अंबरकोट , तो महाकोट आणि त्यामधील तो काळाकोट ! त्या भोवतालचा खोदलेला खंदक. छिन्नी लावून तासलेले कडे. ती महाभयंकर अंधारी ! सारेच अजब

महाराष्ट्रातील एक अत्यंत अभेद्य गड. पण फितुरीपुढे तोही पडला अल्लाउद्दीन खिलजीच्या महत्त्वाकांक्षेपुढे देवगिरी नमला. पाण्याच्या पखाली घेऊन अफगाण स्वार अंधारीपुढच्या गरम तव्यासमोर उभे राहिले आणि त्यांच्या त्या जोशापुढे रामदेवराय यादवाने सपशेल शरणागती पत्करली.

पण याहीपेक्षा भयंकर असा एक प्रकार या दुर्गात घडला. जिजाऊ साहेबांचे वडील लखुजी जाधवराव आणि त्यांचे तीन मुलगे हे कुतुलघच्या हौदाजवळ तळ ठोकून होते. त्यांना निजामशाहाने दरबारात बोलावले होते काय होणार दरबारात ? जहागीर वाढवून मिळणार की आणखी.....? लखुजीराज जाधवराव आपल्या अचलोजी , रघूजी आणि यशवंतराव या तीन मुलांना घेऊन देवगिरीवर निघाले. बहादूरजी हा चौथा मुलगा मागेच राहिला.

राजे गडावर आले. निजामशाहाचा खासा दरबार होता. अनेकजण उभे होते. त्यात इतर मोठे सरदार दरकदार होते. पण कोणीही काहीच बोलत नव्हते. लखुजीराजे पुढे गेले. अतिशय अदबीने त्यांनी सुलतानाला मुजरा घातला. त्याच वेळी ताडकन उठून सुलतान आत निघून गेला. लखुजीराजे अवाक् झाले. एवढा मोठा अपमान !

इतक्यातच म्यानातून तरवारी निघाल्याचे आवाज झाले. लखुजीराजे आश्चर्याने बघत असतानाच तेथे चुपचाप उभे असलेले सफ्दरखान , फरीदखान , मोतीखान तेगा पाजळत पुढे झाले. त्यांनी जाधवराव खानदानावरच झडप घातली.

जाधवराव मंडळीकडे तरवारी नव्हत्या. त्यांनी कट्यारी बाहेर काढल्या

पण त्यांचा उपयोग नव्हता. एका क्षणात चारही जाधवरावांची प्रेते देवगिरीच्या दरबारात रक्ताच्या थारोळ्यात पडली. सुलतान आणि इतरांचा डाव फत्ते झाला. जिजाऊचे माहेर एका क्षणात उद्ध्वस्त झाले.

□□□

= देवगिरी =

औरंगाबाद

★ देवगिरी कोणी कोरला?
★ अंधारीचा ज्ञानेश्वरीत उल्लेख?
★ कुतुबचा होद - सराई
★ कागजपुरा - ? चिनी?

वेरूळ

खुल्दाबाद

★ तोफांवरचे लेख
★ चांदमिनारचे लेख.
★ कागदपत्रे

देवगिरी

औरंगाबाद

★ मकबरा - दिलरसबानू
★ ताज - मकब-यातील साम्य?
★ औरंगजेबाचे हस्ताक्षर

भू-प्रवास
दा. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

# १५

## पुणेकरांचा आवडता
# सिंहगड

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा : पुणे
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : पुणे

---



पुणेकर मंडळींना जवळचा आणि त्यांचा सर्वात आवडता किल्ला म्हणजे सिंहगड. किल्ला अतिशय प्राचीन ! या दुर्गावरच्या सत्तांतराएवढी सत्तांतरे

दुसऱ्या कोणत्याही दुर्गावर झाली नसतील. इसामीच्या ' शाहनामा-ए-हिंद ' या ग्रंथात मुहम्मद तुघलकाने कोळ्यांच्याकडून हा दुर्ग कसा जिंकून घेतला याची हकीगत आली आहे. दुर्गावरच्या गुहा, देवळे, तटबंदी, दरवाजे, बुरुज हे अभ्यासण्यासारखेच आहे.

लोकमान्य टिळकांनी ' आर्क्टिक होम इन द वेदाज ' हा ग्रंथ येथेच लिहिला.

सुभाषचंद्र बोसांनाही मोठी प्रेरणा या दुर्गावर मिळाली.

पेशवाईत पुण्यावर जेव्हा जेव्हा आक्रमणे झाली तेव्हा खजिना या गडावरच आणण्यात आला.

नारायणराव पेशव्यांचे लग्नही या दुर्गावरच लागले.

तान्हाजी मालुसऱ्यासारखा पार्थ पराक्रम गाजवून १ जून १६९३ रोजी नावजी बलकवड्याने हा दुर्ग मोगलांकडून जिंकून घेतला.

१४ एप्रिल १७०३ या दिवशी कोंडाण्याचा हा दुर्ग औरंगजेबाच्या सैन्याने घेतला. दुसऱ्याच दिवशी बादशाहाने सिंहगडाचे बारसे केले. त्याने त्याचे नाव ठेवले, ' किले बक्षिंदाबक्ष ' म्हणजे बक्षीस देणारा जो परमेश्वर त्याने दिलेले बक्षीस !

औरंगजेबाने सिंहगडाच्या विजयाप्रीत्यर्थ अनेक जणांना बक्षीसे दिली तख्ते खाँवर बसून त्याने सिंहगडाची सफरही केली. खानचंद नावाच्या पुरंदरच्या किल्लेदाराची नेमणूक या ' बक्षिंदाबक्षा 'वर किल्लेदार म्हणून झाली. त्याची मनसबही वाढवण्यात आली. त्याच वेळी वीज कोसळून पंधरा हात लांबीचा तट उद्ध्वस्त झाला.

बादशाहाने किल्लेदार बदलून देवीसिंहाला किल्लेदार केले. बादशाहा यावेळी पुण्यात मुक्कामाला आला. त्या वेळी पुण्याचे नाव त्याने ' मुहियाबाद ' ठेवले. संभाजीचा मुलगा शाहू याला मुसलमान करण्याचा एक प्रयत्न झाला. पण शाहूने धर्मांतराला ठाम नकार दिला.


१० नोव्हेंबर १७०३ रोजी औरंगजेब पुणे सोडून राजगड जिंकण्याच्या उद्देशाने निघाला. १६ नोव्हेंबर रोजी उघड्या खुर्चीवर म्हणजे

तख्ते खाँवर बसून तो सिंहगडावर आला. मतलबखानाने आणलेली पक्ष्यांची शिकार औरंगजेबाने पाहिली. नंतर तो म्हणाला, "शाहूने घोड्यावर स्वार होऊन हुजुरात यावे नी मुजरा करावा." सिंहगडावर असे करण्यात औरंगजेबाचा काय डाव होता न कळे? सिंहगडच्या 'बक्षिंदाबक्ष', नावामुळे फार गंमत झाली. याचा अर्थ न कळल्याने एका इतिहासकाराने लिहून ठेवले आहे की मोगलांचा हा बक्षिंदाबक्ष नावाचा सरदार कोण आहे काही कळत नाही बुवा! हा नेहेमी पुण्याभोवती घुटमळताना दिसतो!

□□□

= सिंहगड =

संग्रामदुर्ग




* दरवाज्यावरील शिल्पे यादवकालीन
* गुहा बौद्धांच्या की हिंदूंच्या
* तानाजी द्रोणागिरी चढून आला की कलावंतिणीच्या बुरुजावरून
* कल्याण दरवाजा - शिलालेख
* सुरुंगाचे पाणी - गुहा


* औरंगजेब कोठे आला असावा ?
* राजारामाचा मृत्यू ?
* तानाजी - नावजी शंकराजी नारायण

१६

## मराठ्यांनी जिंकलेला
# अटक

दुर्गाचा प्रकार : स्थलदुर्ग
जिल्हा : पेशावर
राज्य : पाकिस्तान
जवळचे ठिकाण : अटक (पाकिस्तान)

---



पाकिस्तानमधील रावळपिंडीच्याहीवर सिंधू नदीच्या काठावर अटकेचा दुर्ग उभा आहे. सिंधू नदीपासून ते बंगालच्या उपसागरापर्यंतचा सर्व मुलूख

काबीज करावयाचे शिवाजीराजांचे स्वप्न जवळजवळ साकार झाले. पण त्यासाठी १७५८ साल उजाडावयास लागले. १७५८ मध्ये मराठ्यांनी सरहिंद , लाहोर जिंकले.अहमदशहा अब्दालीचा मुलगा तैमूर आणि सरदार जहानखान यांनी लाहोर सोडून पळ काढला.जाताना तैमूरने आपला गुलाम तहमासखान याला गुलामगिरीतून मुक्त केले. सुटकेच्या या उन्मादातच तहमासखानाने धावत जाऊन लाहोरचे दरवाजे उघडले.लाहोरमध्ये प्रथम पाऊल टाकणारा वीर होता मानाजी पायगुडे! या तहमासखानाने 'तहमासनाम्या 'मध्ये ही कथा दिलेली आहे.

तैमूर आणि जहानखान यांनी मात्र पळ काढला. पण त्यांचा पाठलाग करत मराठी फौजा चिनाब , झेलम यांच्यासारख्या मोठ्या नद्या ओलांडून सिंधू नदीच्या काठावरील अटक या दुर्गापर्यंत आल्या. मराठ्यांनी सिंधूही ओलांडली.अटक ताब्यात आली.मराठ्यांनी तैमूरचा पाठलाग चालूच ठेवला होता. पाठलाग करत मराठे पार पेशावरपर्यंत आले.ही गोष्ट १७५९च्या एप्रिल महिन्यात घडली.तुकोजी खंडोजी कदम , नरसोजी पंडित,साबाजी शिंदे वगैरे शिलेदार या भरारी पथकात होते.तैमूरच्या तोफा , बुनगे वगैरे आधीच मराठ्यांच्या हातात आले होते. रघुनाथराव पेशव्याने देखील या अटकेपर्यंत चौक्या बसवण्याचा बेत केला होता. ५ सप्टेंबर १७५८ रोजी पादशाही हरकारे राजा केशवराव याने लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे,

"पूर्वील मुलखाखेरीज लाहोर , अटक सुधा दो करोडाचा मुलक या साली महाराजांचा झाला. पश्चिमेस मुलतान , काबूल व पूर्वेस बंगाल व अयोध्या , प्रयाग राहिली.कुरुक्षेत्र , प्रयाग वाराणसी व गया येथे यवनाचे नाव कशास ? महाराजा सारिखा गोब्राम्हणप्रतिपालक असता हा मनोरथ संपूर्ण विश्वाचा जाला पाहिजे."


रघुनाथरावाने दिवाण लक्ष्मीनारायण याचे स्वाधीन करून पंजाब , मुलतान सुभा अटकेपर्यंतचा मुलूख काबीज करून ढाला माघाऱ्या केल्या. मराठ्यांनी अटकेचा किल्ला जिंकला होता. त्यावर जरिपटका फडफडला होता.

१७

प्रतापी

# प्रतापगड

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा : सातारा
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : महाबळेश्वर



महाबळेश्वरानजीक जावळीच्या खोऱ्यात प्रतापगड ठाकला आहे. चंद्रराव मोऱ्याची जावळी मारल्यानंतर या भोरप्याच्या डोंगरावर

शिवाजीराजांनी किल्ला बांधावयास काढला. मोरोपंत पिंगळ्यांच्या देखरेखीखाली दुर्ग आकार घेऊ लागला.या डोंगराचे मूळ नाव ' रानआडवा गौड '! डोंगर तसा बाजिंदा! पारघाटावर नजर ठेवण्यासाठी तसेच कोयनेच्या खोऱ्यावरही डोळा ठेवण्यासाठी शिवाजीराजांनी बहुधा हा दुर्ग बांधला असावा.


१० नोव्हेंबर १६५९ रोजी दुपारी येथे एक आक्रित घडले विजापुराहून आलेला मदमस्त अफजलखान शिवाजीराजांनी स्वहस्ते मारला. कवी भूषण म्हणतो :

" पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राचा प्रकाश जसा धरतीतलावर पसरतो , तद्वत शिवाजीराजांची कीर्ती पृथ्वीवर पसरली".शिवाजीराजांना फार मोठा विजय प्रतापगडाने दिला.श्री भवानीने दिला.महाराज देवीचे मोठे भक्त होते.श्री भगवती भवानीची स्थापना करावयाचे त्यांनी मनी घेतले. नेपाळमध्ये त्रिवेणीसंगमातील निर्दोष शिला आणण्यासाठी त्यांनी मंबाजी नाईक पानसरे यांना पाठवून दिले. त्यांनी एक उत्तम शिलाखंड नेपाळचा राजा लीलासेन याजकडून आणला.या अप्रतिम , निर्दोष खडकातून ही भवानीची मूर्ती घडवली गेली.इ.स. १६६१ सालच्या अश्विन शुद्ध पंचमीला या मूर्तीची प्रतिष्ठापना प्रतापगडावर केली गेली.भवानीची मूर्ती अतिशय सुदर्शन आहे. तिच्या मस्तकावर शिवलिंग कोरले आहे.डाव्या हातात शंख , ढाल , धनुष्य आहे आणि एका हाताने महिषासुराचे केस पकडले आहेत. देवीच्या उजवीकडील हातात- खड्ग , बाण आणि चक्र आहेत. चौथ्या हातातील त्रिशूल महिषासुराच्या शरीरात खुपसला आहे.

शिवाजीराजांनी देवीची व्यवस्था मोठी चोख लावून दिली. पुजारी , पुराणिक , हवालदार अगदी बयाजवार नेमले. राज्याभिषेकाच्या आधी महाराज या देवीच्या दर्शनास आले. सव्वामणाचे सुवर्णछत्र त्यांनी या देवीला अर्पण केले. कोणी नतद्रष्टांनी इ. स. १९२९ साली दरोडा घालून या दागिन्यांची चोरी केली. ही भवानीच शिवाजीराजांची प्रेरणा होती , शक्ती होती , स्फूर्ती होती.

देवीच्या पूजाअर्चेची व्यवस्था उत्तम असे. प्रतिदिनी सूर्योदयापूर्वी आणि सूर्यास्तानंतर चौघडा वाजत असे. पंचामृतयुक्त सोळा सोपस्कारांनी पूजा होत असे. दर पौर्णिमेस गोंधळ, आरती, बलिदान, नैवेद्य आणि छबिना असे. शिंगांच्या ललकारात, देवीच्या जयजयकारात, संबळ-झांजांच्या झणत्कारात, रात्री मशाली पेटवून देवालयाच्या परिसरात जेव्हा पालखीतून देवीची मिरवणूक निघत असे, तेव्हा सह्याद्रीच्या गहन गाभाऱ्यात बसलेल्या प्रतापी प्रतापगडावर मूर्तिमंत शिवकाल अवतरत असे!

❑❑❑



१८

## बेळगावचा
# भुईकोट

दुर्गाचा प्रकार : स्थलदुर्ग
जिल्हा : बेळगाव
राज्य : कर्नाटक
जवळचे ठिकाण : बेळगाव

---



महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्या सीमाप्रश्नात बेळगाव भरडून निघाले आहे. बेळगावचा चेहेरामोहरा पार बदलून गेला आहे. मराठी आणि

कानडीच्या या वादात बेळगावच्या भुईकोटाकडे बघण्यास आणि त्याचा इतिहास ऐकण्यास कोणाला वेळ मिळणार ?

बेळगाव शहरालगतच हा भुईकोट आहे. खंदकांनी वेढलेल्या या दुर्गात कमलबस्ती नावाची जैनांची कलाकुसरीने सजलेली मंदिरे आहेत. दुर्ग तसा देखणा आहे.

शिवाजीराजांनी १६७५-७६ मध्ये हा दुर्ग जिंकून घेण्याचा एक मोठा प्रयत्न केला. सर्व जुळून आले असता अगदी आयत्या वेळेला बेळगावचा हा घास नियतीने शिवाजीराजांच्या हातून काढून घेतला. त्याची ही कहाणी.

महाराजांचा मुक्काम त्या वेळी कोल्हापूरनजीक पन्हाळगडावर होता. बेळगाव जिंकून स्वराज्यात दाखल करावे असे शिवाजीराजांच्या मनात आले. मग कृतीला किती अवकाश ?

अल्पावधीतच मराठी मोर्चे बेळगावला वळले. मराठी सेनेने वेढा आवळला. आत अनुखान नावाचा आदिलशाही किल्लेदार होता. हा अनुखान अत्यंत हिकमती आणि शूर होता. पण कपटी आणि खुनशी होता. मराठी फौजेला हा अनुखान काही दाद देत नव्हता. वेढा चालूच होता.

पण एक दिवस तिखट मराठी माऱ्यापुढे अनुखानाने माघार घेतली शरणागतीचा प्रस्ताव घेऊन अनुखानाचा वकील शिवाजीराजांच्या सेनापतीकडे आला. "चाळीस हजार होनांच्या बदल्यात मी बेळगावचा किल्ला मराठी फौजेच्या स्वाधीन करावयास तयार आहे". अशी कबुली अनुखानाने दिली. तह ठरला. मराठी फौजेला आनंद झाला. चाळीस हजार होन घेऊन मराठी मंडळी बेळगावच्या किल्ल्याचा ताबा घेण्यास निघाली. अनुखानाचे कपट कोणासही माहीत नव्हते. त्याने काही मराठ्यांना आत येऊ दिले आणि नंतर अचानक आत येणाऱ्या लोकांवर तोफांचा मारा केला. आत गेलेले लोकही कापण्यात आले. बेळगाव या दुर्गाच्या द्वारातच पाचशे मराठे पतन पावले. बेळगाव स्वराज्यात येण्याचे त्याही वेळी राहिले.

पाचशे मराठ्यांचे प्राण आणि रक्त बेळगावच्या दुर्गात सांडले. बेळगावच्या दुर्गासाठी मराठ्यांनी मोठी कर्बानी दिली

११

# कस्तुरीरंगनाचा
# शिरा

दुर्गाचा प्रकार : स्थलदुर्ग
जिल्हा : तुमकूर
राज्य : कर्नाटक
जवळचे ठिकाण : तुमकूर



बंगलोरच्या वायव्येस सरळ रेषेत सुमारे १०० कि. मी. अंतरावर शिऱ्याचा भुईकोट उभा आहे. चौकोनी बुरुजांची तटबंदी हे त्याचे वैशिष्ट्य

आहे. हमरस्त्याच्या नजीकच असल्याने सहजच या दुर्गाची सफर करता येते. यालाच 'शिरेपट्टणही' म्हणतात.

किल्ल्याला काही मोठा खंदक नाही. पण आतील शिबंदी जर जिद्दीची असेल तर फारसा लढाऊ किल्लाही ती दीर्घकाळ लढवू शकते. शाहजीराजांकडे हा किल्ला होता.

या शिऱ्याच्या दुर्गात कस्तुरीरंगन नावाचा एक राजा राज्य करीत होता. राजा बेदरकार होता. शूर होता. आपल्या सैनिकांच्या मनात त्याने चैतन्य निर्माण करून ठेवले होते. किल्ला लढविण्यात हे सैनिक वाक्बगार होते.

आदिलशाहीकडून एकदा अफजलखानाचा हल्ला या शिऱ्याच्या कस्तुरीरंगनावर आला. खान अफजलखान मुहम्मदशाही हा विजापूरचा अत्यंत शूर पण क्रूर सरदार होता. कर्तबगार पण खुनशी होता. त्याच्या सैन्याने शिऱ्याचा भुईकोट वेढला.

कस्तुरीरंगनानेही दुर्ग लढवण्यास सुरुवात केली. त्याचे लोक जिद्दीचे होते. तोफा, दारूगोळे, बंदुका, गोफणगुंडा यांची आत रेलचेल होती. त्यामुळे अफजलखानासारख्या कसलेल्या सेनानीचेही काही चालत नव्हते. लक्ष्मण रेषेसारखीच एक रेखा या दुर्गातील लोकांनी मारून ठेवली होती. या रेषेवर आदिलशाही सैन्य आले की आतून फार तिखट मारा होत असे. अनेक दिवस वेढा चालला. दुर्ग जिंकण्याचा कोणताही मार्ग अफजलखानास दिसेना. किल्ल्यातील सामानसुमानही हळुहळू कमी होत होते.

एक दिवस अफजलखानाने तहाचा प्रस्ताव मांडून आपला वकील किल्ल्यात पाठवला. राजा कस्तुरीरंगनानेही तहास मान्यता दर्शवली. तहाची बोलणी करण्यासाठी अफजलखानाने कस्तुरीरंगनास मेजवानीस किल्ल्याबाहेर बोलावले. राजाला अफजलखानाचे कपट माहीत नव्हते. राजा अफजलखानाच्या शामियान्यात आला. मेजवानी चालू असतानाच अचानक तलवारी घेऊन अफजलखानाचे लोक पुढे आले आणि त्यांनी कस्तुरीरंगनाचा शिरच्छेद केला. हाच कपटी अफजलखान पुढे स्वराज्यावर चालून आला. शिवाजीराजांनी मात्र खानावर मुळीच विश्वास ठेवला नाही.

२०

# साताऱ्याचा अजिंक्यतारा

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा : सातारा
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : सातारा

---



साताऱ्यालगतच एक छोटा गिरिदुर्ग उभा आहे. सध्या या दुर्गाला 'अजिंक्यतारा' म्हणतात. पण शाहनशाह औरंगजेबाने हा किल्ला

जिंकल्यावर त्याचे नाव ठेवले होते 'आजमतारा'! त्याचा मुलगा मुहम्मद आजम याचे नावच या दुर्गाला देण्यात आले.

छत्रपती संभाजी महाराज यांचा अत्यंत क्रौर्याने वध करण्यात आल्यानंतर औरंगजेब मराठ्यांचे एक एक किल्ले घेण्याच्या पाठीमागे लागला. पण संभाजीराजांच्या हौतात्म्याने मराठ्यांच्यात एक वेगळेच चैतन्य निर्माण झाले. किल्ले लढवण्यासाठी एक वेगळीच रग त्यांच्या अंगात निर्माण झाली.

१० डिसेंबर १६९९ रोजी औरंगजेबाने सातारच्या दुर्गाला वेढा घातला. जमिनीपासून या दुर्गाची उंची असेल फार तर साडेतीनशे मीटर्स! किल्ला फार बुलंद आहे असेही नाही. पण वर लोक मात्र हिंमतबुलंद होते. सुभानजी आणि प्रयागजी अनंत हे दुर्गावरचे अधिकारी होते.

साकी मुस्तैदखानाने लिहिले आहे : "साताऱ्याचा किल्ला म्हणजे मराठ्यांची राजधानीच होती. किल्ल्यात तोफा, रसद, इत्यादी सामग्री भरपूर होती. किल्ल्यावर पाण्याचे झरे होते. उन्हाळ्यातही ते आटत नसत किल्ल्यात कसलेले वीर होते. त्यांना प्राण देणे ही क्षुल्लक गोष्ट वाटत असे. या दुर्गाभोवतालचा मुलुख मराठ्यांनीच जाळून फस्त केला होता. त्यामुळे मोगलांना अडचणी आल्या.


रात्री अपरात्री किल्ल्यातून बाहेर पडून प्रयागजी आणि त्यांचे सहकारी औरंगजेबाच्या वेढ्यात घुसत असत. मारामारी करून परत जात असत.

जसा वेळ जात होता, तसा किल्ल्यातील लोकांपेक्षा वेढ्यातले मोगलच जेरीस आले. गवत, चारा जाळलेला, विहिरी आटलेल्या, कही काबाडीवर होणारे हल्ले, मधेच मारली जाणारी रसद यामुळे मोगलांची फार पंचाईत झाली.

१३ एप्रिल १७००ची पहाट उगवली. मोगलांनी सुरुंग लावण्यासाठी दोन भुयारे खणली होती. त्यात सुरुंग पेरून त्यांना बत्ती देण्यात आली एक सुरुंग फुटला, त्यात तट फुटून किल्ल्यातील काही लोक दगावले. प्रयागजी प्रभू दगडमातीच्या ढिगाऱ्यात सापडले पण वाचले! तेवढ्यातच

दुसरा सुरुंग उडाला. त्यामुळे फुटलेला मोठा तट हा पुढे घुसणाऱ्या मोगलांच्याच अंगावर ढासळला! दगडमातीच्या ढिगाखाली हजारो मोगल मारले गेले. अनेक उंच फेकले गेले. वाचून पुढे गेलेल्या मोगलांवर प्रयागजींची धाड आली. तटावर चढलेले सर्व मोगल कापले गेले. शेवटी २१ एप्रिल १७०० रोजी सुभानजीने सातारा किल्ला मोगलांना दिला.

□□□



२१

शिवलंका

# सिंधुदुर्ग

दुर्गाचा प्रकार : जलदुर्ग
जिल्हा : सिंधुदुर्ग
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : मालवण

---



कोकणपट्टीवरच्या जलदुर्गात सिंधुदुर्गाचे स्थान मोठे आहे. महाराष्ट्राला ७५० कि.मीची किनारपट्टी लाभली आहे. या किनारपट्टीवर शिवाजीराजांनी

दुर्गबांधणी करून, या दर्यादौलतीवर एक अभिनव दुर्गशृंखला निर्माण केली. पोर्तुगीज, डच, इंग्रज, सिद्दी यांच्या आरमारांना आणि किनारपट्टीवरील कारवायांना शह बसला!

मालवणनजीकच्या समुद्रात एका बेटावर हा सिंधुदुर्ग सागराशी सामना देत पडीक अवस्थेत आज उभा आहे. या बेटाचे नाव 'कुरटे.' सुरत लुटून प्रचंड धन आणल्यावर त्याचा उपयोग शिवाजीराजांनी हा दुर्ग बांधण्यात केला. हिरोजी इंदलकर या स्थपतीनेच या सागरी दुर्गाची निर्मिती केली गोव्याचे पोर्तुगीज, वेंगुर्ल्याचे डच आणि राजापूरचे इंग्रज यांच्यावर दबाव ठेवण्यासाठी शिवाजीराजांनी या दुर्गाची उभारणी केली. राजापूरची इंग्रजी वखार या आधीच शिवाजीराजांनी लुटली होती.

सिंधुदुर्गाकडे छोट्या बोटीतून जावे लागते. पाणी उथळ आहे आणि खूप खडक आहेत. भोवती पद्मगड, राजकोट या छोट्या रक्षक दुर्गांचा गराडा आहे. शिवाजीराजे म्हणाले होते :

"चौऱ्यांशी बंदरा ऐसा दुसरा जागा नाही" ये बंदरी नूतन जंजिरा वसवावा."


कामाला सुरवात झाली. बेलदार, सुतार, लोहार, गवंडी यांची बेटावर गर्दी झाली. दगड घडवण्याचे काम सुरू झाले. सुतारांनी करवती पेलल्या. गवंड्यांनी चुन्याचा घाणा लावला. युरोपियन टोपीवाले हे आक्रित लांबून न्याहाळू लागले.

हळूहळू तटबंदी आकार घेऊ लागली. बुरुज उभे राहू लागले. हिरोजी इंदलकराच्या मार्गदर्शनाखाली काम मोठ्या जोमाने चालले होते.

कामाची खबर घेण्यास एकदा शिवाजीराजे जातीने तरांड्यात बसून बेटावर आले. ऐन सागरातले ते अप्रूप बघून त्यांना आनंद झाला. महाराज दुर्ग बघावयास निघाले. तटावरुन फिरत असतानाच त्यांचा पाय ओल्या चुन्यात रुतला. बाहेर काढल्यावर त्यांच्या पायाचा ठसा तेथे चुन्यात उमटला. मग कोणाला तरी हुक्की आली! शिवाजी महाराजांना विनंती करून चुन्यात त्यांच्या पायाचा आणि हाताचा ठसा घेण्यात आला!

ही हस्तपद चिन्हे सिंधुदुर्ग मोठ्या अभिमानाने आज मिरवतो आहे. येथे शिवाजीराजांचे एक मंदिर आहे. मराठी आरमाराचा इतिहास दर्शवणारे एक सागरी संग्रहालय येथे हवे. इतिहास आणि परंपरा दाखवण्याचा तो एक मोठा ठेवा ठरेल!

□□□



२२

कुतुबशाहीची राजधानी

# गोवळकोंडा

दुर्गाचा प्रकार : - स्थलगिरी दुर्ग , मित्रदुर्ग
जिल्हा : - हैद्राबाद
राज्य : - आंध्रप्रदेश
जवळचे ठिकाण : - हैद्राबाद

---



आताच्या हैदराबाद या आंध्रप्रदेशच्या राजधानीच्या शहरालगत गोवळकोंड्याचा दुर्ग पडक्या अवस्थेत उभा आहे. अत्यंत समृद्ध

कुतुबशाही, येथे एकदा मस्तीत नांदली हे आजचे दृष्य पाहून खरे वाटणार नाही. फार पडझड झाली आहे. या दुर्गाची सफर करीत असताना कुतुबशाहीचे वैभव काय असेल याची आजही कल्पना येते. प्रवेशद्वारात वाजवलेल्या टाळीची कंपने, तेथून चारपाचशे फुटावर असलेल्या दादमहालात आजही ऐकू येतात आणि मनाला विस्मय वाटतो!

शिवाजीराजे दक्षिण-दिग्विजयाला निघाले असता, दक्षिणियांची पातशाही दक्षिणियांच्या हातात राहावी म्हणून सर्व दख्खनच्या पातशाहांना एकत्र करण्यासाठी कुतुबशाहाकडे आले. अबुल हसन तानाशाह कुतुबशाहा हा शिवाजी राजांना भेटण्यास घाबरत होता. त्याला वाटत होते की, शिवाजीने आलिंगन दिले की तो कोथळा बाहेर काढतो किंवा बोटे तरी तोडतो. पण आक्कण्णा आणि मादण्णा पिंगळी यांच्या मध्यस्थीने त्याने शिवाजीराजांना भेटण्यास मान्यता दिली. सारे भागानगर शृंगारले गेले. रस्त्यारस्त्यांवर गुढ्या, तोरणे उभारली गेली. रांगोळ्या काढण्यात आल्या सारे लोक या विलक्षण शिवाजीराजाची वाट बघंत बसले. हा राजा दिसतो कसा? हा वागतो कसा? हा हसतो कसा? हा बोलतो कसा? शिवाजीराजे. भागानगरातून 'गोल्लाकुंड्याच्या' किल्ल्याकडे चालले. त्यांनाही मोठी गम्मत वाटत होती. त्यांनी दुर्गात प्रवेश केला. कुतुबशाहाने शिवाजीराजांची दादमहालात भेट घेतली. राजस्त्रियाही चिकाच्या पड्याआडून शिवाजीराजांना बघत होत्या. औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन आग्र्याहून निसटलेला माणूस कसा काय असतो, हेच सर्वजण बघत होते. कुतुबशाहला महाराजांच्या फौजेत हत्ती नसल्याचे बघून फार आश्चर्य वाटले. पण शिवाजी राजे म्हणाले, "माझा एक एक माणूस हत्तीसारखाच आहे."

हे उत्तर ऐकून कुतुबशाहाला आणखीनच आश्चर्य वाटले. तो म्हणाला, "राजे, आपला माणूस आमच्या हत्तीशी झुंज देऊ शकेल?"

शिवाजीराजे म्हणाले, "का नाही? अवश्य देईल."


झाले! दुसऱ्याच दिवशी झुंज ठरली. भागानगरात दवंडी पिटवण्यात आली. साऱ्या लोकांना आश्चर्य वाटले. एक मानव हत्तीशी झुंज घेणार?

दुसऱ्या दिवशी गोवळकोंड्याच्या दुर्गाच्या जवळ साठमारीच्या हौद्यात

ही विलक्षण झुंज ठरली. प्रचंड गर्दी झाली. एक माजलेला हत्ती मैदानात सोडण्यात आला. महाराजांच्या परवानगीने येसाजी कंकाने मैदानात उडी मारली. हत्ती येसाजीच्या अंगावर धावून आला. येसाजीने त्याला बगल दिली आणि हत्ती वळताच तरवारीच्या एका फटक्यातच त्याने हत्तीची सोंड कापली. हत्ती चीत्कारत खाली पडला. क्षणातच ही झुंज संपली. येसाजी कंक शिवाजीराजांना मुजरा करीत उभा होता.

□□□

= गोवळकोंडा =




* येसाजी कंकाची नि हत्तीची साठमारी
* दादमहाल
* मादण्णा पिंगळींचे घर
* कागदपत्रे ?
* दुर्गाचे वैशिष्ट्य
* मिश्र दुर्ग ?
* चारमिनार
* सालारजंग
* हुसेनसागर

* शिवाजीराजांचा पुतळा
* श्रीशैल अंतर
* गोपूर - शिल्प
* Selected documents of Aurangzebs reign
* आंध्रा आर्कीऑलज


२३

विजयी

# विजयदुर्ग

दुर्गाचा प्रकार : मिश्रदुर्ग
जिल्हा : सिंधुदुर्ग
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : देवगड

---



वाघोटन नदीच्या मुखावर हे देखणे दुर्गशिल्प उभे ठाकले आहे.अत्यंत बळकट बांधणींयुक्त असा हा दुर्ग आहे.दुहेरी तटबंदी , बुलंद बुरूज , रुंद

तट , त्यातील विचित्र पण उपयुक्त जंग्या , तीन बाजूला पाणी अशी त्याची बांधणी आहे.

'हेलियम' या वायूचा शोध या दुर्गात लागला. तोही एका खग्रास सूर्यग्रहणाच्या वेळी.तुळाजी आंग्रे हा आरमाराचा प्रमुख छत्रपतींची आणि पेशव्यांची सत्ता मानेना.फ्रेंचांची साथ घेऊन त्याने एक वेगळीच खेळी चालू केली. पेशव्यांनी त्याला बुडवून धुळुपांना आपल्या आरमाराचे प्रमुख केले पुढे या धुळुपांनी इंग्रजांचा पराभव याच विजयदुर्गाच्या आसपास केला विजय या नावाच्या संवत्सरात शिवाजी राजांनी याचे बांधकाम केले म्हणून याला नाव दिले विजयदुर्ग ; पण याचे खरे नाव 'घेरिया'!

इंग्रजी हल्ल्याच्या वेळी एक विचित्र घटना घडली. पण त्याचा उलगडा मात्र काही वर्षांपूर्वी झाला. काही मोठ्या इंग्रजी बोटी वाघोटन खाडीतून नस्तात , आत येण्याचा प्रयत्न करीत होत्या. किल्ल्यावरूनही तोफांची गोलंदाजी होत होती. पण इंग्रजी आरमार प्रबळ होते. एकेका बोटीवर दहा दहा तोफा होत्या , त्याही गर्जत होत्या. धुराने वातावरण कोंदून गेले होते वारा जोमात असल्याने शिडे फुगवून इंग्रजी बोटी त्वरेने नस्तात घुसत होत्या. कुणालाही काही पत्ता लागायच्या आत एक इंग्रजी बोट कशावर तरी आदळली आणि फुटली. खूप मोठा आवाज झाला. बोटीवरच्या लोकांनी पाण्यात उड्या मारल्या. तोवर दुसरी बोटही फुटली. धुरामुळे काहीच कळत नव्हते. बोटीवर गोळे पडले नव्हते. पण बोटी फुटल्या हे मात्र खरे.

काही वर्षांपूर्वी भारताच्या नाविक दलातील काही अधिकारी पाणबुड्यांचा पोषाख घालून या वाघोटनच्या खाडीत उतरले. बोटींच्या फुटलेल्या अवशेषांबरोबरच एक विचित्र गोष्ट त्यांच्या नजरेस आली. या खाडीच्या तोंडाशी काही जागा मोकळी आहे. मात्र इतर जागेवर एकावर एक दगड टाकून प्रचंड भिंत उभारण्यात आली आहे. ओहोटीतही ही भिंत दिसत नाही! तज्ज्ञांनी सांगितले की, १७व्या शतकातच या भिंतीची उभारणी झाली असावी. मग शिवाजीराजाच्या दर्यासारंगाने किंवा अन्य कोणी तरी या भिंतीची बांधणी केली काय? दुर्गाचे संरक्षण करण्याची एक अति अभिनव योजना येथे पाण्याखाली अजूनही टिकून आहे.

तट, त्यातील विचित्र पण उपयुक्त जंग्या, तीन बाजूला पाणी अशी त्याची बांधणी आहे.

'हेलियम' या वायूचा शोध या दुर्गात लागला. तोही एका खग्रास सूर्यग्रहणाच्या वेळी. तुळाजी आंग्रे हा आरमाराचा प्रमुख छत्रपतींची आणि पेशव्यांची सत्ता मानेना. फ्रेंचांची साथ घेऊन त्याने एक वेगळीच खेळी चालू केली. पेशव्यांनी त्याला बुडवून धुळुपांना आपल्या आरमाराचे प्रमुख केले पुढे या धुळुपांनी इंग्रजांचा पराभव याच विजयदुर्गाच्या आसपास केला विजय या नावाच्या संवत्सरात शिवाजी राजांनी याचे बांधकाम केले म्हणून याला नाव दिले विजयदुर्ग; पण याचे खरे नाव 'घेरिया'!

इंग्रजी हल्ल्याच्या वेळी एक विचित्र घटना घडली. पण त्याचा उलगडा मात्र काही वर्षांपूर्वी झाला. काही मोठ्या इंग्रजी बोटी वाघोटन खाडीतून नस्तात, आत येण्याचा प्रयत्न करीत होत्या. किल्ल्यावरूनही तोफांची गोलंदाजी होत होती. पण इंग्रजी आरमार प्रबळ होते. एकेका बोटीवर दहा दहा तोफा होत्या, त्याही गर्जत होत्या. धुराने वातावरण कोंदून गेले होते वारा जोमात असल्याने शिडे फुगवून इंग्रजी बोटी त्वरेने नस्तात घुसत होत्या. कुणालाही काही पत्ता लागायच्या आत एक इंग्रजी बोट कशावर तरी आदळली आणि फुटली. खूप मोठा आवाज झाला. बोटीवरच्या लोकांनी पाण्यात उड्या मारल्या. तोवर दुसरी बोटही फुटली. धुरामुळे काहीच कळत नव्हते. बोटीवर गोळे पडले नव्हते. पण बोटी फुटल्या हे मात्र खरे.

काही वर्षांपूर्वी भारताच्या नाविक दालातील काही अधिकारी पाणबुड्यांचा पोषाख घालून या वाघोटनच्या खाडीत उतरले. बोटींच्या फुटलेल्या अवशेषांबरोबरच एक विचित्र गोष्ट त्यांच्या नजरेस आली. या खाडीच्या तोंडाशी काही जागा मोकळी आहे. मात्र इतर जागेवर एकावर एक दगड टाकून प्रचंड भिंत उभारण्यात आली आहे. ओहोटीतही ही भिंत दिसत नाही! तज्ज्ञांनी सांगितले की, १७व्या शतकातच या भिंतीची उभारणी झाली असावी. मग शिवाजीराजाच्या दर्यासारंगाने किंवा अन्य कोणी तरी या भिंतीची बांधणी केली काय? दुर्गाचे संरक्षण करण्याची एक अति अभिनव योजना येथे पाण्याखाली अजूनही टिकून आहे.

२४

शिवमोग्यातील

# चन्नगिरी

दुर्गाचा प्रकार : मिश्रदुर्ग
जिल्हा : शिमोगा
राज्य : कर्नाटक
जवळचे ठिकाण : भद्रावती , शिमोगा , दावणगेरे



कर्नाटकातील शिमोगा जिल्ह्यात एक अतिशय छोटखानी दुर्ग एका टेकडीवर उभा आहे. टेकडी साधारण पुण्याच्या पर्वतीएवढी असेल नसेल !

त्यामुळेच दुर्गात बुलंदी नाही. थोडेसे बांधकाम, छोटे तट, बुरुज, दरवाजा असा त्याचा छोटा साज आहे.

हा सर्व मुलुख शिवाजीराजांचे वडील शहाजीराजे भोसले यांच्या ताब्यात होता. येथून अगदी जवळच असलेल्या होदिगिरी या गावात शाहजीराजांचे वाडे अजूनही दाखवतात. तेथे भवानीचेही एक मंदिर आहे चन्नगिरीवरही शाहजीराजांचा मुक्काम असे. तुंगा आणि भद्रा या दोन नद्यांच्या दुआबात हा प्रदेश येतो. पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील हरिहर, दावणगिरी, चित्रदुर्ग या ठिकाणाहून येता येते.

शाहजीराजांचा होदिगिरी या गावात म्हणजे चन्नगिरी नजीक मुक्काम असताना एकदा एक मोठी दुर्घटना, शिवकालातच येथे घडली.

शिवाजीराजे मोठे धाडस करून औरंगजेबाची सुरत लुटावयास गेले. तेथे त्यांना घवघवीत लूट आणि यश मिळाले. शिवाजी असा अचानक येईल याची कल्पना सुरतवासीयांना नसल्याने अनेक गाफील लोक शिवाजीराजांच्या हातात सहजासहजी सापडले. सुरत लुटून फस्त झाल्यावर शिवाजीमहाराज परतीच्या प्रवासास लागले. याच वेळी एक महाभयंकर बातमी त्यांच्या कानावर पडली ती अशी, "शाहजी महाराज यांचा मृत्यू झाला असून जिजाऊसाहेब सती निघाल्या आहेत"

शिवाजीमहाराज त्वरेने रायगडावर आले आणि त्यांनी आर्जव करून जिजाऊसाहेबांना सती जाण्यापासून रोखले. पण होदिगिरीचा शाहजीराजांचा मृत्यू दुर्दैवी होता. येथील जंगलात शाहजीराजे डुकराच्या शिकारीला निघाले. बंदुकीने सावज टिपण्याचे त्यांना मान्य नव्हते. भाला हातात घेऊन ते एका भल्या मोठ्या डुकराच्या मागे लागले. डुक्कर जीव वाचविण्यासाठी जोरात पळत होते आणि. एका हातात भाला घेऊन शाहजीराजे त्याच्या पाठीमागे घोड्यावरून भरधाव दौडत होते. आणि अचानक घात झाला. दौडणाऱ्या घोड्याचा पाय जमिनीवरील वेलीत अडकला. घोडा पडला, त्याच बरोबर शहाजीराजेही कोसळले. शाहजीराजांच्या डोक्याला मार लागला. ते बेशुद्ध झाले आणि त्यातच त्यांचे निधन झाले. हौदिगिरी नजीकच्या जंगलात त्यांची समाधी उभारण्यात आली आहे.

□□□


२५

शिवछत्रपतींचा

# रायगड

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा : रायगड
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : महाड

---



रायगड हा महाराष्ट्रातील एक अजोड गड . थोरल्या शिवाजीराजांचा राज्याभिषेक याच दुर्गावर झाला. ध्वजगजराज - दुंदुभिविराजित ,

छत्रचामरांकित सार्वभौम सिंहासनावर शिवाजीराजे अभिषिक्त झाले. रायगड ही स्वराज्याची नवी राजधानी झाली. या राजधानीजवळ कायमची वकिलात उभारण्याची स्वप्ने इंग्रज बघू लागले. रायगड म्हणजे रायगडच !

ती नागिणीसारखी सळसळणारी तटबंदी, ते महाकाय बुरुज, त्यांमधील ते प्रवेशद्वार, तो हिरकणीचा कडा, शिवाजीराजांचा राजवाडा, सिंहासनाची जागा, राजसभा, नगरपेठ, व्याडेश्वराचे देवालय, ते शिलालेख, भवानीचा कडा आणि ते टकमक टोक ! सारेच पाहण्यासारखे आणि अनुभवण्यासारखे. टकमक टोकावरून खाली पाताळात पाहिले तर जीव थरारून जातो. तर तळातून वर टकमकाकडे पाहिले तर कड्याचा थरार बघून मन भेदरून जाते ! इतिहासातल्या अनेक भल्याबुऱ्या घटनांचा रायगड साक्षीदार आहे.

शिवाजीराजांच्या निधनानंतर त्याच्या एक राणीसाहेब पुतळाबाई येथेच सती गेल्या. त्याच्या वृंदावनावर सध्या कुत्र्याची समाधी उभी आहे !

या टकमक टोकावर शिवकालात एक गमतीदार घटना घडली. ही एक आख्यायिकाच आहे.

एक दिवस शिवाजीराजे दुपार उलटल्यावर गड फिरावयास बाहेर पडले. चालत ते होळीच्या माळावरून नगर पेठेत आले. लोक त्यांना मुजरे घालत होते. राजे सर्वांची विचारपूस करत होते. राजे चालत पुढे निघाले. थोडे ऊन असल्याने एक छत्रीबारदार छत्री महाराजांच्या डोक्यावर धरून चालत होता. बरोबर चार-सहा तेगबारदारही होते. चालतच ही सर्व मंडळी टकमकाकडे निघाली. वाऱ्याचा थोडा जोर होता. वारा छत्रीत भरत होता. त्यामुळे ती नीट धरताना छत्रीबारदाराची तारांबळ उडत होती. महाराजांबरोबच सर्व टकमक टोकाकडे आले. खाली काळ नदीचे खोरे दिसत होते. पाचाड, रायगडवाडी, निजामपूर, वारंगी ही गावे आणि कोकणदिवा, लिंगाणा हे दुर्ग दिसत होते. हे बघत असतानाच अचानक वाऱ्याचा एक मोठा झोत आला आणि तो छत्रीबारदार आकाशात उडाला पण त्याने छत्रीचा दांडा घट्ट धरून ठेवला होता. तरंगतच तो खाली


निजामपूर गावात उतरला. म्हणून त्या गावाचे नाव पडले छत्रीनिजामपूर ! जगातील हा पहिला पॅरॅट्रूपर !

□□□

## = रायगड =

* पाटलाकडील बखर
* १८८३ सालची हकिगत

* शाह मदार ?
* इंग्रज कैदी
* राणीवसा - भांडारगृहे ?




* कुशावर्तावरील आठ वाडे
* गणेशपट्ट्या
* राजसभेचे प्रवेशद्वार
* शिलालेखात राजसभेचा उल्लेख का नाही
* सभेतील खडक ?
* सूर्य प्रवेशद्वारातून उगवत नाही - ६ जून.

* दारु कोठारे
* निसणीची वाट.
* बाजारपेठ ? घरे ?

२६

# परांडा

दुगाचा प्रकार : स्थल दुर्ग
जिल्हा : उस्मानाबाद (धाराशीव)
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : भूम , बार्शी , कुर्डुवाडी




धाराशीव किंवा उस्मानाबाद जिल्ह्यात भूम जवळ परांड्याचा स्थलदुर्ग आहे. हा दुर्ग फार प्राचीन! कर्नाटकातील धारवाड जिल्ह्यातील हावेरी

तालुक्यातील होन्नत्ती या गावी शके १०४६ म्हणजे इ.स.११२४ सालचा एक शिलालेख उपलब्ध झाला आहे. त्यात पळियंड ४००० या प्रदेशावर राज्य करणाऱ्या महामंडलेश्वर सिंघणदेवाचा उल्लेख आहे. हा पळियंड म्हणजेच प्रत्यंडक किंवा सध्याचा परिंडा वा परांडा. दुर्ग सुंदर आहे. परिखावेष्ठित आहे. म्हणजे भोवती खंदक आहे. बुरुजांभोवती शेरहाजी आहे. म्हणजे कमी उंचीचा तट आहे. बुरुजांवर महाकाय तोफा आहेत. ती अझदहपैकर, ती मलिका-ए- मैदान, ती लांडा कासम ! अक्राळ विक्राळ तोफा आहेत या. मुरार जगदेवाने येथूनच मलिका - ए - मैदान ही अति प्रचंड तोफ विजापूरला नेली. या तोफांचा उल्लेख निकोलाओ मानुचीच्या ' स्टोरिया - द - मोगोर ' या ग्रंथात आला आहे.

शाहजीराजांनी आपल्या शौर्याने परांड्याला वेढा घालून बसलेल्याा मुघल सैन्याचा पराभव केला होता. छत्रपती संभाजीराजांनीही पुढे परांड्यावर हल्ले चढवले होते. परांड्याचे महत्त्व आणि ख्याती मोठी होती. इ.स.१६३४च्या सुमारास या परांड्यास मुघल सैन्याने महाबतखान आणि शाहजादा शाह शुजा यांच्या नेतृत्वाखाली वेढा घातला. खंदकाखालून भुयारे खणण्याचे काम सुरू झाले. पण गडातील लोकांनी त्यातील काहींचा खणून नाश केला; तर इतर भुयारात पाणी सोडून ती निष्फळ केली. एक सुरुंग पुढच्या शेरहाजीत भरला होता, त्याला खाशा शाहजाद्यानेच सरबत्ती दिली. बुरुजाला भेग पाडली पण भगदाड पडले नाही. बाहेरील मुघल सैन्याचे व्यूह आतील आदिलशाह सेनेला कळत असत. मुघल सेनेतील सरदार खानदौरान आणि खानेखानान यात वाकडे आले होते सहाजिकच वेढ्याचे कामात ढिलाई आली होती. मुघलांकडे धान्यसाठा होता; परंतु वैरण, जळण अशी काबाडी मिळत नव्हती. वैरण तीस चाळीस मैलांवरून आणावी लागत होती. शेवटी मुघल सैन्याला वेढा उठवावा लागला.

सारांश, संख्याबळ जास्त असले तरी भुईकोट दुर्ग वेढा घालणाऱ्या सैन्याला जिंकता येतोच असे नाही. स्वतःच्या सैन्याला लागणारे पाणी,

दाणा वैरण याची भ्रांती वेढ्याचे दिवस वाढतात तशी पडू लागते. साठ-सत्तर मैलांवरून कही आणावी लागते. ती आणणाऱ्या टोळीच्या संरक्षणासाठी वेगळी व्यवस्था करावी लागते. किल्ल्याच्या आतील लोकांवरच फक्त संकट येते असे नाही, तर बाहेरच्या आक्रमकांवरही कठीण प्रसंग येतात आणि वेढा उठवावा लागतो. भुईकोट किल्ल्याचे बळ १६३४च्या या मुघल स्वारीच्या वेळी दिसून आले.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रवास
ग्रं. क्र.
शाखा (स्थळ प्रत)

**२७**

## आदिलशाहीचे वैभव

# विजापूर

दुर्गाचा प्रकार : स्थल दुर्ग
जिल्हा : विजापूर
राज्य : कर्नाटक
जवळचे ठिकाण : विजापूर

---



विजापूर म्हणजे आदिलशाहीची राजधानी. भग्नअवशेषातून हिंडत असताना ही राजधानी केवढी समृद्ध असेल याची आजही कल्पना येते.

सध्याचे विजापूर शहर हे कोटातच सामावलेले आहे. ताजबावडी, चाँदबावडी सारखा विहिरी, आसार महल, कल्याण महल, गगन महल यासारखे महल; उपळी आणि शर्झा बुरुजासारखे बुलंद बुरुज, कलाल बांगडी आणि मलिका-ए-मैदान सारख्या अजस्त्र तोफा आणि तो गोलगुंबज! सारेच पाहण्यासारखे! शेवटचा सिकंदर आदिलशाह हा औरंगजेबाचाा कैदी म्हणून अनवाणी या विजापूरच्याच मध्यवर्ती रस्त्याने गेला.

इ. स. १६८६ साली औरंगजेबाने या दोनशे वर्षे चाललेल्या आदिलशाहीचा अखेरचा घास घेतला. आदिलशाही नष्ट झाली. पण हा पाडाव मोगलांच्या शौर्यामुळे झालेला नव्हता. आतील शिबंदीचा धीर खचून त्यांनी किल्ला मोगलांच्या हातात सोपवला. इ.स.१६८६च्या १२ सप्टेंबरला रविवारी आदिलशाहीचे पतन झाले. तरुण सिकंदर आदिलशाह हा आदिलशाहीचा शेवटचा सुलतान, आपल्या वंशपरंपरागत सिंहासनाचा त्याग करून दुपारी एक वाजण्याच्या सुमारास राजवाड्यातून बाहेर पडला. रस्त्याच्या दोन्ही बाजूला विजापूरचे आदिलशाही प्रजाजन अश्रू ढाळीत आपल्या सुलतानावर ओढवलेल्या प्रसंगाबद्दल विलाप करत उभे होते सिकंदराबरोबर राव दलपत हा मुघल मनसबदार होता. तो सिकंदरला घेऊन औरंगजेबाच्या रसूलपूरच्या छावणीत हजर झाला. एका भपकेबाज तंबूत सिकंदरला औरंगजेबासमोर आणण्यात आले.


शाहनशाह औरंगजेबासमोर सिकंदराने मान झुकवली. सिकंदराचे सौंदर्य, तारुण्य आणि राजयोगामुळे मुघली मनसबदार अवाक् झाले. त्याच्या कमनशिबाबद्दल सर्वांनाच अनुकंपा वाटली. प्रत्यक्ष औरंगजेबही या प्रसंगाने भारावून गेला. सिकंदराशी त्याने सांत्वनपर संभाषण केले. त्याला 'खान' अशी 'पदवी' देऊन सिकंदराचा इतर मुघल मनसबदारात भरणा करण्यात आला. मग औरंगजेब विजापूर बघण्यास निघाला. मंगळाई दरवाज्यातून त्याने सोन्याच्या आणि चांदीच्या मोहरा उधळल्या किल्ला, तटबंदी, बुरुज, राजवाडा यांची त्याने पाहणी केली. तेथून तो

मशिदीत गेला. मग राजवाड्यात विश्रांतीला गेला. तेथील भिंतींवर काढलेली उत्तमोत्तम चित्रे त्याने पुसावयास सांगितली. विजापूरचे वैभवशाली पर्व संपले. विजापूरच्या दुर्गासही तारुण्यानंतर वार्धक्य आले. सध्या तर अगदी जराजर्जर अवस्था आहे.

□□□

= विजापूर =

* अफजलखानाची मशीद
* अफजलखानाच्या बायकांच्या कबरी
* अफजलखानाचा शिलालेख
* सहस्रफणी पार्श्वनाथ




* कुमटगी पाण्याची कारंजी
* ऐनापूर
* गोलगुंबज म्युझियम
* शिलालेख
* मुस्तफाखान खवासखान
* मक्का दरवाजा

* औरंगजेबाचे मोर्चे
* आसारमहालातील देवतांची चित्रे ?
* मलिका-ए-मैदानवरील लेख
* खंदक - Covered way - खणी - ?

२८

## अनाम वीरांनी झुंजवलेला
# धारूर

दुर्गाचा प्रकार : स्थल दुर्ग
जिल्हा : बीड
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : बीड , अंबाजोगाई , केज

---



मराठवाड्यातील अंबाजोगाई जवळच धारूरचा स्थलदुर्ग अत्यंत पडीक अवस्थेत कसाबसा तग धरून उभा आहे. पडलेली तटबंदी , फुटलेले

बुरुज, नष्ट झालेल्या इमारती अशी धारूर ऊर्फ फतहाबाद या दुर्गाची आजची अवस्था आहे. याची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. नैसर्गिक दुर्गमता आणि भिंती बांधून केलेली पाणी अडवण्याची सोय यामुळे धारूर शत्रूस जिंकण्यास अवघड झाला आहे. किल्ल्यात एक दोन शिलालेख आहेत.

नेतोजी पालकर या शिवाजीराजांच्या एके काळच्या सरनौबतास तो मुघलांच्या नोकरीत असताना येथेच अटक झाली होती. शिवकालात धारूरला मोठे महत्त्व होते.

शिवाजीराजांच्या मृत्यूनंतर मोगलांना सतावण्याचे सत्कार्य संभाजीराजांनीही चालूच ठेवले. छोट्या छोट्या तुकड्या मोगल मुलूख मारत असत.

धारूर ऊर्फ फतहाबादचा किलेदारखान याने औरंगजेबाला २८ मार्च, १६८३ रोजी एक पत्र पाठवले आहे. त्यात तो लिहितो :

' संभाचा सरदार नारोजी हा जमेतीसह या भागात आला होता. खूप लुटालूट करीत होता. धारूरच्या किल्ल्यावरही त्याचा डोळा होता. पण मला ही बातमी समजल्यावर मी त्याच्याशी सामना करावयाचे ठरवले. मी सैन्य घेऊन शत्रूशी झुंज घेतली. मोठी लढाई झाली. आपल्या सैन्याने मोठा पराक्रम गाजवला. बादशाही सुदैवाने शत्रूचा सरदार मारला गेला. त्याचे शंभर स्वारही आपल्या लोकांनी ठार मारले. त्यांची डोकी कापून मी धारूरच्या किल्ल्यात त्यांचा मनोरा केला! तसेच शत्रूचे अनेक स्वार जखमी झाले. शत्रूचा पराजय झाला. त्यांचे १३ लोक जिवंत सापडले. घोडे, भाले, तलवारी आपल्या हातात आल्या. बादशाहांचा मोठा विजय झाला आहे.'

हा अर्ज पाहून औरंगजेब खूश झाला. त्याने किल्लेदारखानाच्या मनसबीत १०० स्वारांची वाढ केली.

धारूरच्या दुर्गात मराठी मुंडक्यांचा मिनार रचला गेला होता. त्याचा भवताल मराठी रक्ताने लालेलाल झाला होता. मराठी पराक्रम धारूर किल्ल्याच्या भिंतीवर कोरला गेला होता. कोण होते हे स्वार? कोण होते हे अनाम वीर? स्वातंत्र्य-रक्षणासाठी आणि स्वराज्यवर्धनासाठी ज्यांनी आपल्या प्राणाची कुरवंडी रचली, ते मराठी वीर किल्ला जिंकण्याच्या प्रयत्नात धारूरच्या धारातीर्थावर शहीद झाले!

२१

## वैशिष्ट्यांनी नटलेला

# औसा

दुर्गाचा प्रकार : स्थल दुर्ग
जिल्हा : लातूर
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : लातूर

---



इ.स. १९९३ साली ३० सप्टेंबर ला किल्लारीला भयावह भूकंप झाला. या किल्लारीपासून जवळच औशाचा सुंदर स्थलदुर्ग आहे. भूकंपामुळे या

दुर्गालाही बाधा पोहोचली. भूकंप होण्याआधी केवळ ३ दिवस मी या दुर्गात होतो ! पाणी साठवण्यासाठी बुरुजात बांधलेली विहीर आणि जमिनीखालील प्रचंड जलमहाल हे औशाचे वैशिष्ट्य आहे. सुरेख वनराईने मनाला थंडावा मिळतोच मिळतो ; पण त्यातून उडणाऱ्या मोरांमुळे आनंदही द्विगुणित होतो. येथे किल्ल्यातच खूप मोर आहेत. त्यांच्या केकारवाने आसमंत भारलेला असतो. दुर्गाला मोठा खंदकही आहे. बुरुजांवर खूप मोठ्या तोफा पसरलेल्या आहेत. स्थलदुर्गाची अनेक वैशिष्ट्ये म्हणजे जिभी ,रेवणी , फांजी , येथे पाहावयास मिळतात.

शिवकालात घडलेली एक छोटी परंतु अपरिचित अशी एक घटना मी सांगणार आहे. इ. स. १६७०च्या जानेवारी महिन्यात धडलेली ही कथा आहे. आग्र्याच्या कैदेतून निसटून आल्यानंतर १६७० सालपर्यंत मोगलांविरुद्ध कोणताही उठाव शिवाजीराजांनी केला नाही. नंतर मात्र त्यांनी १६६५च्या तहात गेलेले अनेक दुर्ग जिंकून घेण्यास सुरुवात केली तसेच मोगलांचा मुलूख लुटण्यासाठी फौजाही रवाना केल्या. मराठ्यांची अशीच एक तुकडी औशाकडेही आली. औशाचा किल्लेदार बर्खुर्दारखान याने शहेनशाह औरंगजेबाला एक पत्र लिहिले आहे. त्यात तो म्हणतो :


'सीवाचे वीस हजार स्वार आणि पायदळ या प्रांतात येऊन लुटालूट करत आहेत. चौथाई वसूल करत आहेत. सध्या त्यांनी औशाच्या किल्ल्यापासून दोन कोसांवर डेरे दिले आहेत. त्यांचा किल्ल्यावर हल्ला करावयाचा विचार आहे. ही बातमी समजल्यावर ठिकठिकाणी पडझड झालेल्या औसा किल्ल्याची मी दुरुस्ती केली. तसेच तोफखानाही किल्ल्यावर नेऊन लढाईच्या तयारीने ठेवला आहे. मी सावध आहे. परंतु सीवाच्या लोकांनी माझ्या जहागिरीतील मुलुख पूर्ण लुटला आहे फार खराबी करून ठेवली आहे. माझ्या हातात काहीही येत नाही. मला कोणतीही मदत मिळत नाही. माझी परिस्थिती बिकट आहे.'

औरंगजेबाच्या अखबारातून आपल्याला शिवाजीमहाराजांच्या मोहिमेची माहिती मिळत आहे.

सध्याच्या धाराशीव जिल्ह्यातून शिवाजीराजांनी फार मोठी लूट जमा केली. त्यापेक्षा मोगलांना फार मोठी जरब निर्माण केली. औशाच्या किल्लेदाराच्या पत्रातून त्याची अजीजी, हतबलता, निराशा, कारुण्य व्यक्त होत आहे. मुघलांच्या ताब्यात असलेल्या या अशा दुर्गांभोवती शिवाजीराजांच्या फौजेचे वादळ सतत घोंघावत होते. मराठी राज्याच्या मदतीसाठी मोठ्या प्रमाणावर लुटालूट होत होती. चौथाई वसूल केली जात होती. या बळावरच तर मराठी स्वराज्य उभे राहिले.

= औसा =

* लातूरजवळचा औशाचा दुर्ग
* जमिनीखालील जलमहाल
* बुरुजातील विहिरी
* तोफा




* मोर
* शिलालेख
* रेवणी
* म्लेसिज
* शेरहाजी - जिभी

30

## शाहजीराजांचा
# बंगळूर

दुर्गाचा प्रकार : स्थल दुर्ग
जिल्हा : बंगलोर
राज्य : कर्नाटक
जवळचे ठिकाण : बंगलोर




बंगलोर शहर हे शाहजीराजांच्या जहागिरीतील शहर होते. म्हणजे बंगलोर हे मराठ्यांकडे होते ! ऐन कानडी मुलुखातले आणि सध्याच्या

कर्नाटकाची राजधानी असलेले हे शहर मराठ्यांचे होते हे सांगूनही खरे वाटणार नाही. येथे शाहजीराजांचा मोठा किल्ला होता. या किल्ल्यात राहूनच शाहजीराजे आणि त्यांचे मोठे पुत्र संभाजीराजे कर्नाटकातील जहागिरीचा कारभार बघत होते. शिवाजीराजांवर जेव्हा फत्तेखान चालून आला , तेव्हा फर्रादखान नावाचा एक आदिलशाही सरदार बंगलोरवर चालून गेला. त्या वेळी संभाजीराजांनी या फर्रादखानाचा पराभव केला. याच दुर्गातील 'गौरीविलास' नावाच्या महालात शाहजीराजांना जयराम पिंड्ये नामक कवीने 'राधामाधवविलास' नावाचा चंपू एकविला म्हणजे गद्यपद्यमिश्रित ग्रंथ! त्यात शाहजीराजांच्या दिनचर्येची माहितीही आली आहे. जयराम कवी शाहजीराजांच्या दर्शनाला प्रातःकालीच या दुर्गात गेला तेव्हा राजगुरू प्रभाकरभट्ट ढोकेकर प्रातःस्मरण करत होते.

त्या वेळी एका ब्राह्मणाने तेलाने आणि तुपाने भरलेल्या सोन्यारुप्याच्या पराती आणल्या. त्यात राजाने आपले मुख पाहिले. नंतर शाहजीराजांनी एका सभामंडपात प्रवेश केला. या सभामंडपाला 'नवगजी' असे नाव होते. या नवगजीत उजेडाचा लखलखाट असून वरील छत नेत्यांना थंडावा देणारे होते. मासे आणि कासवे यांची चित्रे काढलेला रुजामा नवगजीत अंथरला होता. सर्व सेवकवर्ग आधीच येऊन राजांची प्रतीक्षा करत होता नवगजी इतर सरदारांनी गजबजून गेली होती. अशा नवगजीत तरवारीच्या मुठीवर हात ठेऊन शाहजीराजांनी प्रवेश केला. चवरीवाले त्यांच्यावर चवऱ्या ढाळत होते. कवी ,पंडित , सेनापती यांचे मुजरे घेत सिंहाकृती स्तंभावर बसवलेल्या सिंहासनावर शाहजीराजे विराजमान झाले, राजगुरू प्रभाकरभट्ट ढोकेकरांनी राजांच्या अंगावर तीर्थ शिंपडले. जयराम कवीही शाहजीराजांना भेटला. त्याने बारा नारळ राजांसमोर ठेवले. त्याचा अर्थ कवीने सांगितला की , 'मी बारा भाषातून काव्य करतो'. शाहजीराजांनी जयरामाचे काव्य ऐकले.मग त्यांनी स्वतःच 'शतचंद्रं नभस्तलं' ही समस्या कवीला घातली. कवीने त्याची पूर्ती केली. शाहजीराजांनी कवीला घोडा आणि एक हत्तीही बक्षीस दिला. या वेळी थोरले संभाजीराजे ,

व्यंकोजीराजे , कोयाजीराजे हे शाहजीराजांचे पुत्र हजर होते. हास्यकल्लोळात बंगलोरच्या किल्ल्याची नवगजी भरून गेली. या शाहजीराजांचा कानडी प्रजेला मोठा आधार होता. बंगलोरच्या किल्ल्यातून शाहाजीराजांचा कारभार चालला होता. आज तेथे ती नवगजी नाही. तो गौरीविलास महालही नाही. मराठी राज्याच्या स्मृती बंगलोरला विरून गेल्या आहेत.

❑❑❑



३१

## चाकणचा भुईकोट
# संग्रामदुर्ग

दुर्गाचा प्रकार : स्थलदुर्ग
जिल्हा : पुणे
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण - पुणे

---



पुण्याहून नाशिकला जाताना पुण्यापासून पंचवीस किलोमीटर्स अंतरावर चाकणचा भुईकोट दुर्ग अत्यंत दारुण अवस्थेत उभा आहे. उभा

कसला ? पूर्ण पडलेल्या अवस्थेतच आहे ! एके काळी इतिहास घडवणाऱ्या दुर्गांची काळाच्या ओघात कशी दारुण अवस्था होते , हे पाहण्यासाठी चाकणला भेट देणे आवश्यक ठरते. हा काही फार नामांकित दुर्ग नव्हेच ; परंतु दुर्गबांधणीतील एक अद्‌भुत आजही या पडीक दुर्गाच्या गर्भात कसेबसे तग धरून आहे. पूर्वेस दरवाज्यातून आत आल्यावर वाट उजव्या हातास वळते. सध्या तट फोडून पूर्ण रस्ताच केलेला आहे ! पण ही वाट वळत पुढे अचानक थांबते आणि या वाटेने येणारा शत्रू तटावरील रक्षकांचे भक्ष्य बनतो. या पद्धतीच्या बांधकामाला 'रणमंडळ' म्हणतात. तेच या दुर्गात आहे. मात्र तेथे जाण्याची सध्याची वाट अतिशय दुर्गंधयुक्त आहे, हे ध्यानात ठेवावे. तसेच या दुर्गाचे अनेक दगड लोकांनी आपली घरे , बांधावयास वापरले आहेत , हेही जर इकडे तिकडे नजर टाकली तर दिसून येते. बाहेर पुराणे चक्रेश्वराचे देवालय आहे. ऐन दुष्काळात कचेश्वर ब्रह्मयाने येथे पाऊस पाडला होता ! शिवकालात शायिस्ताखानाच्या प्रचंड फौजेविरुद्ध फिरंगोजी नरसाळ्याने ५६ दिवस हा दुर्ग झुंजवला. शेवटी सुरुंग वापरून दुर्गाचा ईशान्येकडील तट उद्‌ध्वस्त करण्यात आला. मोठ्या नाराजीने फिरंगोजीने हा दुर्ग मोगलांना दिला.


शायिस्ताखानाचा मुक्काम चाकणला असतानाच एक गमतीदार घटना घडली. जाँ बाप्तिस्त ताव्हेर्निए हा फ्रान्सचा जवाहिऱ्या माल विकण्यासाठी दोन चारदा हिंदुस्थानात येऊन गेला. १६६० सालीही तो हिंदुस्थानात आला आणि चाकणच्या मुक्कामात त्याने आपला बहुतेक माल शायिस्ताखानाला विकला. शायिस्ताखान पैसे लवकर द्यावयाचे नाव काढेना सुरतेहून खजिना आला की देतो असे तो म्हणू लागला. इकडे ताव्हेर्निएच्या आदरातिथ्यात मात्र त्याने काहीही उणे ठेवले नव्हते. शेवटी कंटाळून ताव्हेर्निए शायिस्ताखानाचा निरोप घेण्यास गेला. तेव्हा शायिस्ताखान म्हणाला ,

'मालाची किंमत तुला मिळाल्याशिवाय तू काय म्हणून निरोप घेतो आहेस ? पैसे न घेता तू निघून गेलास तर तुला ती रक्कम परत कोण

देणार आहे ?'

शायिस्ताखानाचे शब्द ऐकल्यावर ताव्हेर्निए त्याला म्हणाला, 'आमचे फ्रान्सचे राजे आमच्या बुडालेल्या रकमेची व्यवस्था करतील. आमचे राजेसाहेब अतिशय उदार आहेत. ते मक्केला येणारीजाणारी मुघली जहाजे लुटतील आणि आमची भरपाई करतील.'

हे उत्तर शायिस्ताखानाला झोंबले. त्याने ताबडतोब खजिनदाराला बोलावून औरंगाबादेची हुंडी काढावयास सांगितली. ताव्हेर्निएला रक्कम मिळाली. याच वेळेस चाकणच्या संग्रामदुर्गाला लावलेला सुरुंग उडाला. तट फुटला. फिरंगोजीने दुर्ग रात्रभर लढवला. पण दुसऱ्या दिवशी मोगली निशाण दुर्गावर फडकले.



# ३२

## शिवबाचा स्वर जपणारा
## आग्रा

दुर्गाचा प्रकार : स्थल दुर्ग
जिल्हा : आग्रा
राज्य : उत्तरप्रदेश
जवळचे ठिकाण : आग्रा

---



यमुनेच्या काठावर आग्र्याचा रक्त वर्णी दुर्ग उभा आहे. भले भक्कम दरवाजे, बुलंद बुरुज, भव्य तटबंदी असे या दुर्गाचे देखणे स्वरूप आहे.

दिल्ली दरवाजा , औरंगजेबाने हत्ती फोडलेला हत्ती दरवाजा , अमरसिंह दरवाजा ; असे भव्य दरवाजे , दिवाण-ए-आमोखास ,गुसुलखाना , शीशमहल , अंगुरी बाग असा सगळा थाट आहे.या दिवाण-ए-आमोखास मध्ये दरबार भरत असे. मुघल बादशाह तख्त-ए-ताऊसवर बसून दरबार चालवीत असत.बादशाहखेरीज इतर सर्वजण उभे असत.कोणालाही कोणताही शब्द काढावयाची परवानगी नसे. बोलणे , चालणे , शिंकरणे वगैरे वर्ज्य असे. हे सर्व पाळणे यालाच अदब म्हणत असत. बादशाही अल्काबाचे नारे , बादशाह अथवा वजिराचे बोलणे किंवा बादशाहाच्या परवानगीने बोलणे या खेरीज इतर बोलण्यावर मज्जाव असे.

औरंगजेब दक्षिणेत असताना चोवीस वर्षे या दुर्गाला कुलूप लावलेले होते. शाही परवानगीशिवाय ते काढावयास मज्ञाव होता. आज आपण दुर्गातून एकटेदुकटे फिरत असलो तरी नीरव शांतता जुन्यापुराण्या जमान्याची आठवण करून देते.मग चक्षूंपुढे उभा राहतो तो औरंगजेबाचा घुशलखान्यातील दरबार.तख्त-ए ताऊसवर बसलेला आलमगीर औरंगजेब दरबारात उभे असलेले त्याचे सरदार. तो रसूलबेग रोजभानी , तो कारतलबखान , तो मीर-ए-आतीश तर्बियतखान , तो खानजहान बहाद्दर , बहादूरखान कोकलताश , तो बुंदी नरेश भावसिंह हाडा , तो रणमस्तखान , तो केसरसिंह , तो मुनव्वरखान बारहा !

त्यातही आपल्या मनसबदारी पातळीवर उभा असलेला जोधपूर नरेश जसवंतसिंह , तो रामसिंह कछवाह , तो फुलादखान !

त्या जसवंतसिंह राठोडाच्याच पाठीमागून तारीख १२ मे १६६६ रोजी एक बुलंद दखनी आवाज अचानक विजेसारखा कडाडला ,

"रामसिंघ , हमसे भी आगे ये कौन खडा है ?"


आग्र्याच्या त्या दरबारात इतर कोणालाही बोलावयाची सुद्धा मुभा नसताना हा बेदरकार आवाज कोणाचा ?

तो होता सह्याद्रीच्या सिंहाचा ! स्वराज्याच्या शेराचा. राजगडाच्या स्वामीचा. जिजाऊच्या पुत्राचा ! महाराष्ट्राच्या लाडक्या शिवबाचा. त्या

आचारशील, विचारशील, दानशील, धर्मशील, सर्वज्ञपणे सुशील अशा जाणत्या राजाचा. आग्र्याच्या त्या लाल दुर्गातून हिंडत असताना कानठळ्या बसवणाऱ्या त्या बुलंद आवाजाचे प्रतिध्वनी आजही ऐकू येतात !

□□□

## = आग्रा =




* दुर्गाची बांधणी
* फतेहपूर सिक्री आणि आग्रा यांच्या बांधणीतील फरक
* मुलुकचंदाची सराई
* गोखले - ठाणे यांनी घेतलेला शोध
* केशवराज - मथुरा ?
* कागदपत्रे - राजस्थानी
* ताजमहाल - राजमहाल ?
* कवीन्द्र धौलपूर


**३३**

## राणी लक्ष्मीची झांशी

# शंकरगड

दुर्गाचा प्रकार : स्थल-गिरिदुर्ग
जिल्हा : झांशी
राज्य : उत्तरप्रदेश
जवळचे ठिकाण : झांशी

---



राणी लक्ष्मीबाईच्या अभूतपूर्व पराक्रमाने न्हाऊन निघालेला झांशीचा बुलंद दुर्ग बुंदेलखंडात उभा आहे. ओर्छा , दतिया , तळबेहट , सामथर अशा


अनेक इतर दुर्गांची जवळीक झांशीला लाभली आहे. तेराव्या शतकात चंदेल्यांनी बांधलेल्या या दुर्गावर तटाबुरुजांचा साज ओर्छ्याच्या बीरसिंह देवाने इ. स. १६१३मध्ये चढवला. या दुर्गाचे नाव शंकरगड !

पहिल्या बाजीरावाच्या अतुलनीय पराक्रमाने मराठी राज्याच्या सीमा विस्तारल्या. पारोळ्याच्या हरि दामोदर नेवाळकर या सरदाराच्या ताब्यात बाजीरावाने हा बुलंद दुर्ग दिला. दहा दरवाजे, उत्तम संरक्षक तटबंदी, बुलंद बुरुज, मनोरे, विहिरी, तळी यांनी झांशीचा दुर्ग युक्त आहे. भवानीशंकर, कडकबिजली या सारख्या प्रचंड तोफा आ वासून पहुडल्यात ! इथेच राणी लक्ष्मीचे दोन विश्वासू गोलंदाज गुलाम गौसखान आणि खुदाबक्ष यांच्या कबरी आहेत. तसेच राणी लक्ष्मीबाईच्या पश्चात इंग्रजांशी लढणाऱ्या दोन वीरांगना जलखरी दुलैया आणि मोतीबाई यांच्याही समाध्या आहेत.

इ. स. १८५६-५७ मध्ये इंग्रजांनी झांशीचा दुर्ग वेंढला. इंग्रज घोड्यावरून दौडत दुर्गात येऊ लागले. राणी लक्ष्मीबाई स्वतः एका मोर्चातील तोफेजवळ उभी होती. जंग्याजंग्यातून कडाबिनी घेऊन बरकंदाज उभे होते. इंग्रजी स्वार किल्ल्याच्या पश्चिमेस आल्यावर लक्ष्मीबाईने तोफ डागली. त्यात पाच इंग्रजी स्वार मरण पावले. इतरही तोफा उडाल्या. त्या माऱ्यात इंग्रजांचे फार नुकसान झाले. दुसऱ्या दिवशी मात्र इंग्रजी तोफांची गोळे किल्ल्यात आले. त्यात किल्ल्याचे फार नुकसान झाले. हे गोळे विनाशक पद्धतीचे असल्याने आतील छर्रे, दारू उडून प्राणहानीही झाली. इंग्रजांनी दक्षिणेकडील बुरुजांवर आणि तोफांवर हल्ला करून तोफा बंद पाडल्या. त्या बुरुजावरून मराठे हटले होते. इंग्रजांनी बुरुजाचा आणि तोफेचा ताबा घेतला. एका फिरंगी नामांकित गोलंदाजाने त्या तोफेतून इंग्रजी गोळे डागण्यास सुरुवात केली. त्याबरोबर राणी लक्ष्मीने आवेशाने आपल्या लोकांना आवाहन केले. मराठ्यांनी एल्गार केला. आणि त्या फिरंगी गोलंदाजास ठार केले. ज्याने त्याला ठार केला, त्या लढवय्यास लक्ष्मीबाईने चांदीचा तोडा बक्षीस दिला. इंग्रज रात्रीही गोलंदाजी करीत असत. दिवसा

सूर्यामुळे तोफगोळ्यांची मजा दिसली नाही तरी रात्रीच्या अंधारात त्यांची शोभा उत्तम दिसे ! एके दिवशी इंग्रजी गोळा किल्ल्यावरील दारू कोठारावर पडला. न भूतो न भविष्यती असा आवाज होऊन किल्ल्यावर फार पडझड झाली. धुराने आणि धुळीने किल्ला कोंदून गेला. चाळीस लोक मरण पावले त्यांच्या रक्तामांसांचा चिखल किल्ल्यावर झाला. करुण किंकाळ्यांनी वातावरण भरून गेले. पण दुर्ग लढत होता. एका अपार जिद्दीने राणी लक्ष्मी लढत होती. आपला झांशीचा दुर्ग लढवत होती. स्वतः मोर्च्यात हिंडत होती. ढालतलवार घेऊन प्रोत्साहन देत होती. आधुनिक इंग्रजी साधनांपुढे कोणत्या सामुग्रीनिशी झांशीचा दुर्ग झुंज देत राहिला. त्या रात्रीची शांतता ही पुढे होणाऱ्या अनर्थाची सूचनाच होती.

= झांशी =




* झाशीच्या दुर्गाचे नाव
शंकरगड - माझा प्रवास
* तटावरून घोडा ?
* कबरी ?
* इंग्रज कोणत्या बुरुजावर ?
* दुर्गद्वार शिल्पे
* मराठा बांधणी
धमपूर
* तटबंदी - बालेकिल्ला

३४

## समर्थांच्या वास्तव्याने पुनीत झालेला

# महिपतगड

दुर्गाचा प्रकार : गिरिदुर्ग
जिल्हा : रायगड
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : खेड

---



कोकणात सह्याद्रीच्या रांगेला खेटून काही दुर्ग उभे आहेत. खेडपासून जवळच दुर्गभटक्यांची एक आवडती दुर्गत्रयी मौजूद आहे. रसाळगड,

सुमारगड आणि महिपतगड! बेलदारवाडी या तळातल्या गावाहून महिपतगडावर येण्यास वाट आहे. पश्चिमेकडील दहिवली गावातूनही गडावर येता येते. गडाचा विस्तार मोठा आहे. वरून विहंगम दृष्य दिसते. निवाऱ्याला एक छोटे देऊळ आहे.

या गडावर श्री समर्थ रामदास स्वामींनी काही काळ वास केला होता. मुळात शिव-समर्थ संबंधावर अस्सल समकालीन कागद कमीच; पण कागदाचा एक कपटाही कधी कधी फार मोठी गोष्ट सांगून जातो.

८ ऑगस्ट १६७६ रोजी शिवाजीराजांनी या महिपतगडाचा सरहवालदार दसमाजी नरसाळा याला एक पत्र लिहिले :

श्री

श्रीरामदास

मशहुरल अनाम दसमाजी नरसाळा सरहवालदार माहाल इमारती किले महिपतगड प्रति राजश्री शिवाजीराजे सुहूर सन सबा सबैन व अलफ. श्री रामदास गोसावी सिवतरी राहताती. सांप्रत कितेक दिवस गडावरी रहावया किलियास येतील. त्यास जे लोक येतील तितकीयानसी गडावरी घेणे. घर जागा बरा करून देणे. हरएक विसी खबर घेत असत जाणे. जोवरी असतील तोवरी असतील. उतरो म्हणतील तेव्हा उतरो देणे छ ८ जमादिलाखर परवानगी हुजूर मर्यादेयं विराजते.

शिवाजीराजांचे हे महत्त्वाचे पत्र आपल्याला श्री समर्थ रामदास महिपतगडावर मुक्कामास येणार आहेत त्यासंबंधी गोष्ट सांगून जाते.

शिवाजीराजे दसमाजी नरसाळा या महालाच्या सरहवालदाराला म्हणतात की, 'रामदास गोसावी' महिपत गडावर मुक्कामाला येणार आहेत. ते आणि त्यांच्या बरोबरचे लोक यांना गडात घ्यावे. त्यांची सोय करावी. राहतील तितके दिवस राहू द्यावे आणि जातील तेव्हा जावो द्यावे, गडावर चांगली जागा पाहून त्यांची सोय बघणे.

शिवाजीराजांनी स्वतः परवानगी पाठवली होती. श्री रामदास आणि त्यांचे शिष्य या महिपतगडावर काही काळ येऊन राहिले होते. त्यांची

व्यवस्था बघण्यास शिवाजीराजांनी सरहवालदार दसमाजी नरसाळा याला सांगितले होते.

समर्थांच्या वास्तव्याने महिपतगड पावन झाला आहे ही माहिती अल्प परिचित आहे. ८ ऑगस्ट १६७६ नंतर कधीतरी समर्थ येथे येऊन राहिले अशी एखादी पाटी या दुर्गावर लावली तर या महिपतगडाचे ऐतिहासिक महत्त्व वाढणार नाही का?

= महिपतगड =




* समर्थांचे गडावर वास्तव्य का ?
* तटबंदी- दरवाजे ?
* हवा शुद्ध ?
* महिपतगड का महिमानगड
* अस्सल पत्र कोठे ?
* मकरंदगड- बिरमणी

३५

# मुंबईचा किल्ला

दुर्गाचा प्रकार : स्थल दुर्ग
जिल्हा : बृहन्मुंबई
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : मुंबई

---



मुंबईचा सध्याचा फोर्ट म्हणून जो भाग आहे, तेथेच पूर्वी मुंबईचा किल्ला होता. पूर्वी मुंबईची वस्ती ही किल्ल्यातच होती. १७ फेब्रुअरी

१८०३ रोजी येथे प्रचंड आग लागली आणि त्यात हा दुर्ग भस्मसात झाला. या दुर्गाला पूर्वी बारा बुरुज होते. त्यावर तोफा सज्ज असत. दुर्गाची भिंत लायन गेटपासून जवळजवळ बोरीबंदर स्टेशनपर्यंत गेली होती. त्या तटबंदीत अपोलो गेट , बझार गेट , चर्चगेट असे दरवाजे होते. सायंकाळी सात वाजल्यानंतर सारे सामसूम होऊन जाई. सूर्यास्त आणि सूर्योदयाला तोफा झडत. तिन्ही त्रिकाळ गस्त चालू असे. किल्ल्यात काही विहिरी होत्या. समुद्राच्या भरती-ओहोटीच्या वेळेस त्या विहिरीतील पाण्याची पातळीही खालीवर होत असे.


अठराव्या शतकात ईस्ट इंडिया कंपनी , पेशवे , फ्रेंच आणि पोर्तुगीज हे सत्तेसाठी आपापसात झगडत होते. १७३९ साली चिमाजीअप्पाने पोर्तुगिजाची वसई जिंकून घेतली. पण त्या वेळी इंग्रज हे पोर्तुगिजांच्या मदतीला धावले नाहीत. इंग्रजांनी पेशव्यांशी मैत्रीचे संबंध ठेवले होते. त्याच वेळी मुंबई बेटावरची आपली संरक्षण व्यवस्था मजबूत करण्याचे कामही चालू ठेवले होते. किल्ल्याभोवती खंदक खणण्याचे इंग्रजांनी ठरवले. त्यासाठी व्यापाऱ्यांकडून खंडणी गोळा करण्यात आली. किल्ल्याच्या परिसरातील झाडे तोडण्यात आली.

इंग्रजांचे पेशव्यांच्या दरबारात येणेजाणे चालू होतेच. वरिष्ठांना भेटी देण्याचा कार्यक्रमही चालू होता. पेशव्याकडूनही इंग्रजांना भेटी मिळत असत. त्या वेळचा मुंबईचा गव्हर्नर बोर्चियर याला पेशव्यांनी एक हत्ती बक्षीस दिला. हा हत्ती खूप खादाड होता. हत्ती सर्वांना फार आवडला ; पण त्याला पोसताना इंग्रजांच्या नाकी नऊ येऊ लागले ! त्याची तैनात राखणे ही इंग्रजांची डोकेदुखी ठरली. ह्या हत्तीवर हजारो रुपये खर्च होऊ लागले आणि व्यवहारी इंग्रज या हत्तीचा उपयोग काय असे विचारू लागले. हत्ती विकून टाकला तर पेशव्यांचा अपमान होईल. आणि पेशव्याशी संबंध मात्र मग बिघडतील. कंपनीला तर हे नको होते. हत्ती मात्र रोज त्याचा मलिदा भरपूर खात होता. अंगावर धूळ उडवत होता. पाण्यात डुंबत होता. त्याला इंग्रजांची समस्या कळत नव्हती. त्यामुळे तो खूश होता. पण या समस्येमुळे

बोर्चियरला झोप लागत नव्हती. शेवटी कंपनीने ठरवल्यामुळे बोर्चियरने तो हत्ती सुरतेच्या एका व्यापाऱ्याला विकून टाकला. आणि आपली सुटका करून घेतली. मुंबईच्या फोर्टमधील वातावरण हे असं होतं. आता तो फोर्ट नाही. तो हत्तीही नाही , तो गव्हर्नरही नाही , आता आहे फक्त गर्दी , गर्दी आणि गर्दी !

□□□

## = मुंबईचा किल्ला =




* मुंबईच्या दुर्गांचे अवशेष
* इंग्रजी - पोर्तुगीज बांधणी ?
* द्वारावरची चिन्हे ?
* दर्या- संग्रहालय
* बेटावर जहाज करून त्यातच संग्रहालय
* गुराबा - पाल
* खांदेरी दर्शन
*


३६

## सिद्द्यांच्या उरावरची राजपुरी

# पद्‌मदुर्ग

दुर्गाचा प्रकार : जल दुर्ग
जिल्हा : रायगड
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : अलिबाग, मुरुड

---



मुरुडच्या जंजिऱ्याच्या समोरच एका छोटेखानी बेटावर पद्‌मदुर्ग हा जंजिरा - जलदुर्ग अत्यंत पडीक अवस्थेत उभा आहे. जंजिऱ्याच्या सिद्द्यांना

शह देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी या दुर्गाची उभारणी केली. या दुर्गाच्या उभारणीसाठी जे लोक हातभार लावत होते , त्यांच्यासाठी शिवाजीराजांचे अंतःकरण तिळतिळ तुटत असे.आणि जर या कामगारांना मदत वेळेवर पोहचली नाही , तर त्यांचे पित्त खवळत असे !

या बेटाचे नाव कांसा ! कासवासारखा हा छोटा खडक पाण्यावर दिसत असे. जंजिऱ्याच्या सिद्दयांनी कोकण किनारपट्टीचा छळ मांडला होता. लूटमार , कत्तल यांना उधाण आले होते.बायाबापड्यांची अब्रू अरबस्तानात विकली जात होती.शिवाजीराजांना हे पाहवेना.सिद्दयांना जरब ही बसलीच पाहिजे असे त्यांच्या मनात आले.कांश्याचे हे छोटेखानी बेट त्यांच्या नजरेत आले.त्यांनी मान डोलावली आणि कारागीर दुर्ग बांधणीच्या कामाला लागले. पाथरवट दगड घडवावयास लागले.गवंड्यांचा चुन्याचा घाणा फिरू लागला. लोहारांचे भाते फुलू लागले. सुतारांच्या कषण्या , करवती बाहेर पडल्या. अवघेअवघे दुर्ग बांधणीच्या कामाला लागले.

सिद्दयांच्या हेरांनी ताबडतोब ही बातमी जंजिऱ्यात पोहोचवली.हिरव्या विषारी नजरा कांश्याच्या बेटाकडे वळल्या. आपल्या उरावरच चाललेली ही दुर्ग- बांधणी त्यांना पाहवेना. हा दुर्ग झाला तर जंजिऱ्याचे अस्तित्वच धोक्यात येईल ना ! जंजिऱ्यावर सिद्दयांचे आरमार चढाईची तयारी करू लागले.

शिवाजीराजांनी कांश्याच्या बेटाच्या रक्षणार्थ दर्यासारंग आणि दौलतखान यांच्यावर जबाबदारी सोपवली होती. दर्यासारंग म्हणजे वेंटजी भाटकर. हा मायनाक भंडाऱ्याचा भाऊ.

तसेच या आरमाराला रसद पुरवण्याचे काम जिवाजी विनायक या प्रभावळीच्या सुभेदारावर सोपवले होते.त्यांच्या हातून कामात कुसूर झाला म्हणून शिवाजीराजांनी एक जोरदार पत्र त्यांना पाठवले:


"पद्मदुर्ग उभारून राजपुरीच्या उरावर दुसरी राजपुरी करत आहोत.त्याला मदत व्हावी.पाणी , फाटीकरून सामान मिळावे , ते तुमच्याने झाले नाही. पद्मदुर्ग हबशी फौज चौफेर जेर करत असतील आणि तुम्ही

ऐवज न पाठवून सर्व खोळंबा कराल. ही मोठीच हरामखोरी तुम्ही करत आहात. हबश्यांनी तुम्हाला काही देऊन आपले केले की काय ? ऐशा चाकरास ठीक केले पाहिजे. याउपर बोभाटा आल्यावर तुमची पर्वा करणार नाही. गनिमाचे चाकर म्हणून तुम्हाला शिक्षा करू"

१९जानेवारी १६७५ चे हे पत्र आहे. दुर्गाविषयी त्यावर काम करणाऱ्या लोकांविषयी शिवाजीराजांना केवढी आपुलकी होती ती या पत्रातून दिसते. सिद्दयांच्या जंजिऱ्याच्या उरावर हा दुसरा जंजिरा पद्मदुर्ग उभा राहिला. सिद्दयांच्या आक्रमणाचे घाव सोसतच त्याची बांधणी झाली.

□□□


= पद्मदुर्ग =



३७

# चंपावती कोरलई

दुर्गाचा प्रकार : मिश्र दुर्ग
जिल्हा : रायगड
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : रेवदंडा, अलिबाग



कुंडलिका नदी समुद्राला जेथे मिळते, तेथेच कोरलईचा दुर्ग खडा आहे. चौल, रेवदंडा वैगरे प्रदेश या दुर्गावरून उत्तम दिसतो. द कौतू या


पोर्तुगीज इतिहासकाराने या दुर्गाचे वर्णन तपशीलवार केले आहे.

"हा किल्ला भव्य असून त्यावर फक्त जमिनीच्याच बाजूने हल्ला चढवणे शक्य आहे. समुद्र आणि खाडी यामध्ये एक खंदक असून, त्यावरील पुलावरून फक्त आत प्रवेश करता येतो. हा पूल उडवला तर किल्ला अभेद्य आहे. या दुर्गाच्या प्रवेशद्वारावर एक मोठा सिंह काढला असून, त्याखाली 'येथे लढल्याशिवाय प्रवेश नाही' अशी अक्षरे कोरली आहेत. किल्ल्याच्या माथ्यावर मध्यवर्ती बालेकिल्ला असून, त्याच्या शिखरावर एक गरुड पक्षी काढलेला आहे. या पक्ष्याच्या खाली 'येथे पोहोचण्यापूर्वी अंतरिक्षाचा मार्ग पत्करावा लागेल,' अशी दर्पोक्ती कोरलेली आहे.

छत्रपती संभाजीराजांनी १६८३ साली या दुर्गावर मोठा हल्ला चढवला. पण पोर्तुगीज शिबंदीने संभाजीराजांना यश लाभू दिले नाही. मराठ्यांचा हल्ला नाकामयाब ठरला. कोरलईवर पोर्तुगीज निशाण फडफडत राहिले.

हे निशाण खाली खेचण्यास १७३९साल उजाडले. पेशवे चिमाजी अप्पांच्या नेतृत्वाखाली उत्तर फिरंगाणाची ही पोर्तुगीज हिरवळ उडवण्यास मराठी फौजात बाहेर पडल्या. वसईला मराठी फौजेचा वेढा पडला. तसेच तळगडाचा हवालदार सुभानजी माणकर याच्या नेतृत्वाखाली मराठी फौजा कोरलईवर चालून आल्या. पोर्तुगिजांना एकदमच अडचणीत आणण्याची चिमाजीअप्पांची योजना होती. कोरलईला मराठी फौजांचा वेढा पडला. किल्ल्यावरून पोर्तुगीज तोफांचा धडधडाट सुरू झाला. मराठे वेढा आवळून बसले. कुंडलिकेच्या पलीकडील रेवदंड्यावर मानाजी आंग्र्याने हल्ला चढवला. सुभानजी माणकराच्या वेढ्यापुढे कोरलईवरील पोर्तुगीज शिबंदीचा प्रतिकार कमी पडू लागला. बाहेरून मदत मिळण्याची आशाही खुंटली. पोर्तुगिजांना दम धरवेना. सुभानजी माणकराच्या फौजेवर अकस्मात हल्ला चढवण्याचा बेत शिजू लागला. हा बेत पार पडण्याआधी मराठी फौजेने कोरलईवर रात्रीच हल्ला चढवला. निशायुद्धात प्रवीण असलेल्या मराठी सैन्याने दुर्गावर तुफान कापाकापी केली. तिखट मराठी

माऱ्यापुढे पोर्तुगीज शरण आले. कोरलईच्या दुर्गावर जरिपटका फडफडू लागला. सिंहाच्या प्रवेशद्वारातून मराठी सैन्य लढतच आत गेले आणि बालेकिल्ल्याच्या गरुडाजवळ अंतरिक्षात जाण्याचा मार्ग मात्र त्यांनी पोर्तुगिजांना दाखवला. उत्तर फिरंगाणात मराठी अंमल जारी झाला.



# ३८

## अलिबागचा
# कुलाबा

दुर्गाचा प्रकार : मिश्रदुर्ग
जिल्हा : रायगड
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : अलिबाग

---



अलिबागेच्या सुदर्शन दर्याकिनाऱ्याजवळच पाण्यात अलिबागेचा कुलाबा दुर्ग उभा आहे. हा दुर्ग फार गमतीदार आहे. त्याला स्थल दुर्गही

म्हणवत नाही कारण त्याला खंदक नाहीत आणि पायी आत चालत जाता येते.आणि जलदुर्गही म्हणवत नाही ; कारण ओहोटीच्या वेळेस भोवतालचे म्हणजे पूर्वेकडचे पाणी ओसरून जाते ! या ओहोटीच्या वेळेसच या दुर्गात दुर्ग-दर्शनासाठी जाता येते आणि जर वेळेत परत आले नाही तर भरतीमुळे दुर्गातच अडकून राहावयाची वेळ येते !

हा दुर्ग बहुधा संभाजीराजांनी बांधला असावा.कारण १६७९-८०च्या खांदेरीच्या जलसंग्रामात या दुर्गाची नोंद कोठेही येत नाही.या दुर्गावरच्या गाड्यांवर ठेवलेल्या इंग्रजी तोफा आणि दर्या दरवाज्यावरील सुसरींची नक्षी आवर्जून पाहण्यासारखी. बाकी दुर्ग उजाड वाटतो.पण त्यालाही कारण आहेच ! अग्नीनारायणाच्या तांडवाने चार सहा वेळा येथे आग लागून या दुर्गातील इमारती भस्मसात झाल्या.इ.स.१७७० मधील आग फारच मोठी होती.पिंजरा बुरुजाजवळ लागलेल्या आगीने मोठे स्वरूप धारण केले.त्यात कोठ्या , इमारती , घोड्यांच्या पागा , वाडे , मठ इत्यादी जळून खाक झाले.

पण याहीपेक्षा मोठी आग सुमारे शंभर वर्षे अलिबागेच्या दुर्गात धुमसत होती.ती होती स्वार्थाची , अंतर्कलहाची , भाऊबंदकीची ! कान्होजी आंग्र्यांच्या कुळात एकापेक्षा एक बहाद्दर निर्माण झाले. सेखोजी , मानाजी , संभाजी , तुळाजी असे कर्तबगार पुरुष मराठी दर्यादौलतीच्या कामात होते. पण त्यांच्यात ऐक्य नव्हते. सत्तेसाठी , स्वार्थासाठी चुरस निर्माण झाली.त्यांची राष्ट्रदृष्टी अधू झाली.स्वार्थाला तेज चढले.जे शत्रूशी करावयास पाहिजे ते भावाभावांशी केले. संशयांची , स्वार्थाची विषवल्ली रुजली. तुळाजी हा सेखोजीचा सावत्र भाऊ. सेखोजी मरण पावला तेव्हा तुळाजी विजयदुर्गावर होता.त्याने येसाजी आणि मानाजी या दोन भावास कुलाब्यावर पाठवले; पण त्यातही मोठेच भांडण झाले. मानाजीने पोर्तुगिजांची मदत घेऊन येसाजीस कैद केले आणि त्याचे डोळे काढले. तिकडे सेखोजीचा सख्खा भाऊ संभाजी संधीची वाट बघतच होता.त्याने मानाजीवर स्वारी केली. शेवटी बाजीरावाला शाहूने मानाजीच्या मदतीला पाठवले.त्याने पोर्तुगिजांचे चांगलेच कांडात काढले.एकूण काय परकियांची

मदत घेऊन स्वकियांवर हल्ले चढवणे हाच मार्ग त्या वेळी होता का? स्वार्थाचा शाप महाराष्ट्राला कोठवर नेणार? अलिबागेचा पाणकोट स्वार्थाच्या पिशाच्याच्या स्मृती उराशी बाळगून आहे

= अलिबाग =





* कान्होजी आंग्र्यांचे स्मारक
* भरती-ओहोटी
* किल्ल्याची दुर्गमता ?
* शिवाजीराजांनी बांधला ?
* संभाजीच्या काळात बांधकाम
* नबाबाची स्वारी
* अपर-लोअर चौल.

३१

# सरहद्दीवरचा
# तेरेखोल

दुर्गाचा प्रकार : मिश्र-दुर्ग
जिल्हा : गोवा
राज्य : गोवा दीव दमण
जवळचे ठिकाण : सावंतवाडी, वेंगुर्ले



तेरेखोल नदीच्या उत्तर तीरावर तेरेखोलचा किल्ला बांधला आहे. मराठे आणि पोर्तुगीज यांच्यात या दुर्गाच्या मालकीबाबत लढाया झाल्या. अरबी

सागराचे नितांत रमणीय दर्शन या दुर्गावरून होते. महाराष्ट्र आणि गोवा याच्या सरहद्दीवरच हा दुर्ग ठाकला आहे. दुर्ग छोटेखानी आहे. पोर्तुगीज बांधणीचा पगडा त्यावर फार पडला आहे. क्रूर, अत्याचारी जुलमी राजवटीच्या उन्मादाच्या खुणाही येथे दिसतात. पहारेकऱ्यांसाठी बांधलेल्या कॅपसूल टाइप टेहेळणीच्या खोल्या खास बघण्यासारखा. गोवा सरकारने सध्या हा किल्ला विकावयास काढला आहे म्हणे ! पण या किल्ल्याच्या सभोवार मराठी रक्ताचा शिडकावा झाला आहे.

१५ ऑगस्ट १९५५चा तो दिन. भारताला स्वातंत्र्य मिळून सात वर्षे आलेली. पण या भूमीत अजूनही काही परकीय सत्ता थाटून बसलेले होतेच. गोव्यात पोर्तुगीज होतेच. स्वातंत्र्यांची चळवळ मराठी मनाला स्वस्थ बसूच देईना. पनवेलच्या हिरवे गुरुजींच्या अधिपत्याखाली १२७ हिंदुस्थानी सत्याग्रहींची एक तुकडी तेरेखोलला आली. हे सत्याग्रही निःशस्त्र होते. हिरवे गुरुजींच्या हातात भारताचा तिरंगा फडकत होता. धीरोदात्त रीतीने, शांतपणाने गुरुजी तेरेखोलच्या किल्ल्याकडे चालले होते. लोक त्यांच्या मागे मागे घोषणा देत चालले होते. तेरेखोलच्या किल्ल्यावर पोर्तुगीज शिबंदी, बंदुका तयार करून वरिष्ठांच्या हुकुमाची वाट बघत होती. घोषणा देत मोर्चा किल्ल्यानजीक आला. हिरवे गुरुजी झेंडा किल्ल्यावर लावण्यास धावले. त्या क्षणी पोर्तुगीज किल्लेदाराने गोळीबाराचा इशारा दिला. निःशस्त्र सत्याग्रहींवर गोळीबार सुरू झाला. त्यातील एका गोळीने हिरवे गुरुजींचा बळी घेतला

त्यांचा रक्तलांछित देह तेरेखोलच्या किल्ल्याच्या दारात पडला. भारताचा ध्वज जमिनीवर पडण्याआधीच पितळे नावाच्या युवकाने मुसंडी मारून तो ध्वज हातात घेतला आणि धावत पळत तो तेरेखोलच्या दरवाज्यात अडकवला. एवढ्यात पोर्तुगीज बंदुकांच्या गोळीने पितळयांचाही बळी घेतला. सत्याग्रहींवर अमानुष गोळीबार झाला.


भूमीच्या स्वातंत्र्यासाठी मराठी रक्त तेरेखोलच्याभोवती सांडले. इतके की तेरेखोल नदीही लाल होऊन गेली ! मराठी वीरांचा पराक्रम गोव्याच्या

भूमीत मुरला. सध्या गोवा सरकार येथेच पंचतारांकित हॉटेल काढणार आहे म्हणे !

□□□

## = तेरेखोल =

* तेरेखोल हा मिश्रदुर्ग
* पोर्तुगीज बांधणीच्या पहाऱ्यांच्या जागा
* दरवाजा - (जिभी)
* खंदक ?
* हिरवे गुरुजींची पास
* महाराष्ट्र - गोवा.
* सुंदर सूर्यास्त.



**४०**

भू-प्रवास ८८९
२८११२९
२४।३।८५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## स्तिमित करणारा

# नळदुर्ग

दुर्गाचा प्रकार : स्थल दुर्ग
जिल्हा : (धाराशीव) : उस्मानाबाद
राज्य : महाराष्ट्र
जवळचे ठिकाण : सोलापूर, उमरगा

---



सोलापूर-हैदराबाद हमरस्त्यावरच हा दुर्ग ठाकला आहे. त्याचा पसारा मोठा आहे. कर्नल मेडोज टेलरने लिहिले आहे :

“आजपर्यंत पाहिलेल्या अनेक स्थळात नळदुर्गाचा किल्ला ही एक अतिशय आकर्षक जागा आहे.”

बोरी नदीचे पाणी वळवून ते खंदकासारखे संरक्षणासाठी वापरले आहे. आणि सगळ्यात गंमत म्हणजे एके ठिकाणी त्यावर धरण बांधून त्या धरणाच्या भिंतीतच आकर्षक जलमहाल बांधलेला आहे. पूर्वी वेगवेगळ्या पातळीवरील वाटांमधून पाणी जाऊन सज्जापुढे पाण्याचा पडदा तयार होत असे. रंगीबेरंगी दीपांमुळे एक अवर्णनीय शोभा प्राप्त होत असे. ती पाणचक्की, तो उपळी बुरुज, त्यावरील प्रचंड तोफा, ती नवबुर्जी, गंडभेरूंड! सारेच आवर्जून पाहण्यासारखे !

छत्रपती संभाजीराजांच्या सैन्याने या दुर्गावर हल्ला चढवला होता. हा हल्ला १६८३च्या फेब्रुअरी महिन्यात झाला. ही सर्वस्वी अपरिचित हकीगत औरंगजेबाच्या पर्शियन कागदपत्रात आली आहे.

संभाजी राजांचा एक सरदार, माणको बल्लाळ याने ५००० स्वारांनिशी नळदुर्गावर हल्ला चढवला. अर्थात हे सैन्य वेढा घालण्यास अपुरे होते. पण माणको बल्लाळाचा तसा उद्देशही नव्हताच. जरब बसवणे आणि लुटालूट करणे हाच त्याचा मनसुबा होता. किल्लेदार कासीमखान हा आपली जमेत घेऊन शेवटी किल्ल्याबाहेर आला. मराठ्यांकडे तोफा वगैरे काही नव्हत्या, फक्त घोडदळच होते. हातघाईची लढाई झाली. दोन्हीकडे खूप नुकसान झाले. मोगलांना सोलापूरहून कुमक येते आहे अशी बातमी मिळाल्याने, संभाजीराजांचा सरदार माणको बल्लाळने माघार घेतली. काही अरबी घोडीही त्याच्या हातात लागली. या लढाईत मीर आबीद हा दिवाण ठार झाला. त्याला ६००जात आणि ७०स्वारांची मनसब होती. त्याचे गुर्जबारदारही मारले गेले. स्वतः कासीमखानास जखमा झाल्या.

आपल्या इतिहासाच्या तुटपुंज्या साधनात या काही चतकोर कागदांमुळे संभाजीराजांच्या भरारी पथकांची माहिती मिळत आहे. उस्मानाबाद परिसरात ही पथके फिरत होती. औसा, धारूर, नळदुर्ग, परंडा या दुर्गाभोवती मराठे घिरट्या घालत होते. रसद मारत होते. लूट मिळवत होते. औरंगजेब या अशा छोट्या लुटमारीमुळे जेरीस आला होता.

REFBK-0027921

REFBK-0027921